cmyk

## संपादकीय

### राजकारणाची कूस बदलेल?

दोन टप्प्यांत आणि वीस दिवसांमध्ये होणारी निवडणूक हे चार राज्ये व एका केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकीच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी केवळ एक आहे. एरवी पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आदी राज्यांना लोकसभेसारख्या सार्वत्रिक निवडणुकीत देशाचा कौल ठरवणारे प्रदेश मानले जात नसले तरी यावेळी तेथील राजकारण कूस बदलेल की काय, अशा चर्चा असल्याने ही निवडणूक लक्षवेधी ठरली आहे.

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३२० | बुधवार दि.१८ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना पत्नीसह वर्षभर मोफत प्रवास

मुंबईः एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विधानभवन येथे महत्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत कर्मचारी संघटनांनी मांडलेल्या तक्रारी व मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात आले. तसेच एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. एसटी महामंडळात कार्यरत असलेल्या सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाने चालक–वाहकांवरील कारवाई, आगार व्यवस्थापनातील अडचणी तसेच काही प्रशासकीय प्रक्रियांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे मंत्री सरनाईक यांचे लक्ष वेधले होते. या पार्श्वभूमीवर संघाचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्री सरनाईक यांनी सकारात्मक चर्चा केली.

### गंगेच्या पात्रात नॉनव्हेज इफ्तार पार्टी ; १४ अटकेत

वाराणसीः सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या एका व्हिडिओमुळे मोठी खळबळ उडाली आहे. या व्हिडिओमध्ये १५–२० मुस्लिम तरुण गंगा नदीत एका नौकेत बसून इफ्तार करताना दिसत आहेत. या व्हिडिओवर हिंदू संघटनांनी तीव्र आक्षेप घेत वाराणसीतील कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करून मदनपुरा भागातील १४ तरुणांना अटक केली आहे. मंगळवारी समोर आलेल्या या व्हिडिओची शहरात जोरदार चर्चा सुरू आहे. व्हिडिओमध्ये अंदाजे १५ ते २० रोजेदार गंगेच्या पात्रात एका नौकेवर बसून इफ्तार करत असल्याचे दिसत आहे. व्हिडिओ बनवणारा तरुण नौकेवर ठेवलेल्या खाद्यपदार्थांकडे कॅमेरा फिरवतो, हा व्हिडिओ समोर येताच हिंदू संघटनांनी संताप व्यक्त केला असून, ''गंगा केवळ नदी नसून ती आमची माता आहे,'' अशी भूमिका मांडली आहे.

### दिल्लीचा लाडू जिंकू शकणार नाही – ममता बॅनर्जी

कोलकाताः पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा सामना कोलकाताच्या भवानीपूर मतदारसंघात विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांच्याशी होणार आहे. त्यामुळे २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत एक रोमांचक लढत अपेक्षित आहे. तृणमूलच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी स्वतः या अत्यंत महत्त्वाच्या निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर करताना ही घोषणा केली. या निवडणुकीत ममता बॅनर्जी सलग चौथ्यांदा निवडणूकीसाठी उभ्या राहणार आहेत. नंदीग्राममध्ये, जिथे सुवेंदू विद्यमान आमदार आहेत, तिथे तृणमूल काँग्रेसने भाजपाचे माजी पंचायत प्रमुख आणि माजी तृणमूल नेत्याचे निकटचे सहकारी पवित्र कर यांना उमेदवारी दिली आहे. विशेष म्हणजे, उमेदवारांची यादी जाहीर होण्याच्या काही मिनिटांपूर्वीच कर यांनी तृणमूल काँग्रेसमध्ये पुन्हा प्रवेश केला. ममता बॅनर्जी यांचे एकेकाळचे निष्ठावान असलेले सुवेंदू यांनी २०२१ मध्ये नंदिग्राम मतदारसंघात टीएमसी प्रमुख ममता बॅनर्जी यांचा जवळपास २,००० मतांनी पराभव केला होता.

# रब्बीच्या ई–पीक पाहणीला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

### चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा



मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील रब्बी हंगाम २०२५–२६ मधील ई–पीक पाहणी करण्याची मुदत आता ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात येत असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी (दि.१७) विधानसभेत केली.**

बावनकुळे म्हणाले की, ''२५ जानेवारी २०२६ पासून सहाय्यक स्तरावर ई–पीक पाहणीची नोंदणी सुरू करण्यात आली

▶▶ पान २ वर

# केंद्राकडून अडते, सहकारी सोसायट्यांच्या कमिशनमध्ये वाढ

दिल्ली । प्रतिनिधी

**केंद्र सरकारने सरकारसाठी गहू आणि धान खरेदी करण्यासाठी अडत्यांच्या (कमिशन एजंट) आणि सहकारी सोसायट्यांना दिल्या जाणाऱ्या कमिशनमध्ये प्रतिक्विंटलमागे जवळपास ५ रुपयांची वाढ केली आहे. ही वाढ १ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या रब्बी विपणन हंगाम २०२६–२७ पासून लागू होईल, असे अन्न मंत्रालयाने म्हटले आहे.**

यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या शिफारशींनुसार, सरकारने पंजाब आणि हरियाणा राज्यांतून गहू खरेदीसाठी अडत्यांच्या कमिशनमध्ये प्रतिक्विंटल ४६ रुपयांवरुन ५०.७५ रुपयांपर्यंत वाढ केली आहे. राजस्थानमध्ये गहू खरेदीसाठी अडत्यांचे कमिशन प्रतिक्विंटल ४१.४० रुपयांवरून ४५.६७ रुपयांपर्यंत वाढवले आहे. रब्बी हंगामातील धान खरेदीसाठी त्यांचे कमिशन प्रतिक्विंटल ४५.८८ रुपयांवरून ५०.६१ रुपये करण्यात आले आहे. त्याचबरोबर, सहकारी सोसायट्यांना दिल्या जाणाऱ्या

▶▶ पान २ वर

# बीड : कामगार कार्यालयातील भ्रष्ट कारभार चव्हाट्यावर !

## आ.सुरेश धस यांनी लक्षवेधी मांडत केला पर्दाफाश, एका व्यक्तीला दोन वेळा मृत दाखवून उचलले पैसे

मुंबई / आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगार विभागात मृत कामगारांना जिवंत दाखवून त्यांच्या नावे अनुदान दिल्याचा मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. दहा वर्षापुर्वी मरण पावलेल्या व्यक्तीला नगर परिषदेतील अधिकाऱ्यांनी जिंवत दाखवून त्याने चक्क शंभर दिवस काम केल्याचे कागदोपत्री दाखवले. त्यानंतर त्याच व्यक्तीला पुन्हा मृत दाखवून त्याच्या कुटुंबियांना दोन लाख तीस हजार रुपयाचे अनुदान मिळवून दिल्याचा दावा भाजप आमदार सुरेश धस यांनी विधानसभेत केला. बीड जिल्ह्यात अशी शंभर प्रकरण समोर आली आहेत, आणखी एवढीच प्रकरण घडल्याचा अंदाज आहे. काही



श्री. सुरेश रामचंद्र धस

कामगार हे बुर्ज खलिफा आणि व्हाईट हाऊसमध्ये काम करून आल्याचे देखील नगरपरिषदेच्या रेकॉर्डवर नोंदी आहेत.

या घोटाळ्याची व्याप्ती लक्षात घेता सचिव स्तरावरील अधिकाऱ्याची नियुक्ती करून चौकशी करावी तसेच दोषी अधिकाऱ्यांकडून घोटाळा झालेली कोट्यवधीची रक्कम वसुल करावी, अशी मागणीही सुरेश धस यांनी केली. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार सुरेश धस यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून बीडमधील बांधकाम कामगार विभागातील हा घोटाळा चव्हाट्यावर आणला. २०२० ते २०२६ दरम्यानच्या अर्जांमध्ये मृत व्यक्तींना जिवंत दाखवून १०० दिवस काम केल्याचे घोषणापत्र दिल्याचे आणि पुन्हा मृत दाखवून वारसांना सुमारे २.३० लाख रुपयांचे अनुदान दिल्याचे उघड झाले आहे. २०१३ मध्ये मृत झालेल्या व्यक्तीला २०२३ मध्ये कामगार दाखवण्याचा प्रतापही नगरपंचायत, नगरपरिषद,

▶▶ पान २ वर

**बीडः बार कौन्सिल ऑफ इंडिया महाराष्ट्र अँड गोवा संचालक सदस्य निवडणुकीतील महिला प्रतिनिधी म्हणून सुषमा आत्माराम मोकाशी जागीरदार यांनी आज बीड जिल्हा न्यायालयातील निखिल बांधवांची संवाद साधला यावेळी त्यांचा बीड बार कौन्सिलच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी बार कौन्सिलचे सदस्य तसेच ॲड.बळासाहेब कोल्हे, ॲड.विक्रांत पारगावकर, ॲड.शशिकांत सावंत, ॲड. भीमराव चव्हाण, ॲड.राजू शिंदे, ॲड.किशोर खेडकर, ॲड. अविनाश गंडले, ॲड. हेमाताई पिंपळे, ॲड. शैलेंद्र कांबळे, ॲड .नारायण शिरसाट, ॲड.तांदळे.**



# संगमनेरमध्ये सहावीतल्या मुलीवर ॲसिड हल्ला; परिसरात खळबळ

संगमनेर । प्रतिनिधी

संगमनेर तालुक्यात एक अत्यंत संतापजनक घटना घडली असून, सहावीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर ॲसिड हल्ला करण्यात आला आहे. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील शाळेत शिकणारी ही विद्यार्थिनी शाळा सुटल्यानंतर घरी जात असताना अज्ञात तरुणाने तिच्या चेहऱ्यावर ॲसिड

▶▶ पान २ वर

# विधानसभेत 'धर्मस्वातंत्र्य विधेयक' मंजूर!

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्र विधानसभेने धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६ आवाजी मतदानाने मंजूर केले आहे. या विधेयकात बळजबरी, फसवणूक, आमिष किंवा विवाहाच्या माध्यमातून होणाऱ्या धार्मिक धर्मांतरांना प्रतिबंध करण्यासाठी कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत.**

गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी माहीती दिली की, प्रस्तावित कायद्याचा उद्देश घटनात्मक अधिकारांचे रक्षण करत असतानाच फसवणूक, बळजबरी किंवा आमिषाद्वारे होणारे धर्मांतर रोखणे हा आहे. धार्मिक धर्मांतर हे स्वेच्छेने आणि पारदर्शक पद्धतीनेच व्हावे, हे या विधेयकाचे उद्दिष्ट आहे. काही सदस्यांनी विधेयकातील एका तरतुदीवर आक्षेप घेतला होता. या तरतुदीनुसार दुसऱ्या धर्मात धर्मांतर करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला जिल्हा दंडाधिकाऱ्यांना ६० दिवस आधी पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे. सदस्यांनी या तरतुदीला अन्यायकारक आणि घटनात्मक हमींच्या विरोधात असल्याचे म्हटले. या तरतुदीचा उद्देश केवळ हे पडताळून पाहणे हा आहे की, धर्मांतर हे व्यक्तीच्या मुक्त इच्छेने होत आहे. ही प्रक्रिया वैयक्तिक स्वातंत्र्यावर निर्बंध घालण्यासाठी नसून, पारदर्शकता आणि संरक्षण प्रदान करण्यासाठी आहे. धर्मांतरानंतर २१ दिवसांच्या आत अधिकाऱ्यांना माहिती देण्याच्या आवश्यकतेबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाचेही निरसन

▶▶ पान २ वर















cmyk

## अग्रलेख

# राजकारणाची कूस बदलेल?

दोन टप्प्यांत आणि वीस दिवसांमध्ये होणारी निवडणूक हे चार राज्ये व एका केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकीच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी केवळ एक आहे. एरवी पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आदी राज्यांना लोकसभेसारख्या सार्वत्रिक निवडणुकीत देशाचा कौल ठरवणारे प्रदेश मानले जात नसले तरी यावेळी तेथील राजकारण कूस बदलेल की काय, अशा चर्चा असल्याने ही निवडणूक लक्षवेधी ठरली आहे.

केंद्रासह अनेक राज्यांमध्येही सत्तेत असलेला भाजप आणि प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस यांच्या प्रभावाशिवाय जी काही मोजकी राज्ये आहेत, तेथे या निवडणुका होत आहेत. त्यातील आसाम आणि पुदुचेरीसारखा केंद्रशासित प्रदेश वगळता पश्चिम बंगाल, केरळ व तामिळनाडूमध्ये भाजपविरोधी पक्षांची सरकारे सत्तेत आहेत. याआधीच्या निवडणुकांमध्ये भाजपचे मर्यादित लक्ष्य या राज्यांमध्ये चंचुप्रवेश करणे असायचे; मात्र वर्षागणिक त्याच्या महत्त्वाकांक्षा आणि तेथे आपले स्थान निर्माण करण्यासाठीची धडपड वाढू लागली आहे. त्यात काही प्रमाणात यशही येत आहे. भाजपच्या एकूणच हिंदुत्वकेंद्रित राजकारणासाठी सध्या पश्चिम बंगालपेक्षा योग्य भूमी नसावी. विद्यमान मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर मुस्लीम अनुनयाचे आरोप करण्यावरच भाजप यावेळी थांबलेला नाही तर तृणमूल सरकारला भ्रष्टाचाराच्या प्रकरणांच्या माध्यमातूनही घेरण्याचा पुरेपूर प्रयास केला जात आहे. मतदारयाद्यांची विशेष सखोल पडताळणी प्रक्रिया अर्थात एसआयआरच्या माध्यमातून सुमारे ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आल्याने त्याचा किती फटका तृणमूलला बसतो यावरही भाजपचे यश अवलंबून राहील. ममता या प्रक्रियेला बंगाली मतदारांचा हक्क हिरावण्याचा कट म्हणत आहेत. या प्रपोगंडाचा कसा परिणाम होईल, त्यावर तृणमूलचे सत्तेत पुन्हा येणे ठरू शकते. अन्यथा, बिहारप्रमाणे बंगालातही सदर तपासणी भाजपला लाभदायक होईल. सोबतीला 'जय मां दुर्गा' व 'जय मां काली' या घोषणांनी बंगाली जनतेच्या धार्मिक भावना चेतवण्याचा प्रयत्न केला जात आहेच. गेल्या लोकसभा निवडणुकीत बहुमतासाठी अन्य पक्षांची मदत घ्यावी लागलेल्या भाजपला आता पश्चिम बंगालसारखी राज्येही ताब्यात हवी आहेत. तामिळनाडूत भाजप धर्माचा नव्हे तर राष्ट्रवादाचा आधार घेईल. त्यांचा मित्र अण्णा द्रमुक पूर्वीसारखी उभारी घेण्याच्या स्थितीत नसला तरी एका मतदानपूर्व चाचणीत या आघाडीला द्रमुकपेक्षा जास्त यशाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने संपूर्ण भारतवर्षात प्रसार करण्याच्या भाजपच्या दीर्घकाळच्यामनीषेला पालवी फुटली असावी. मात्र, कडव्या तामीळ अस्मितेसमोर कथित राष्ट्रवाद किती टिकाव धरेल ते सांगता येत नाही. अण्णा मलाईसारखा भाजपचा आक्रमक खासदार राष्ट्र प्रथम असे म्हणत असताना पक्षाचा छुपा अजेंडा हिंदी राष्ट्रभाषा म्हणून थोपण्याचा असल्याच्या द्रमुकच्या आक्षेपाला उत्तर देऊन मते मिळवणे जमेल का हाही प्रश्न आहे. तसे झाले नाही तर स्टालिन पुन्हा मुख्यमंत्री होतील. चेंगराचेंगरी फेम थलपती विजयला करुणानिधी, रामचंद्रन यांच्याप्रमाणे एकहाती निवडणुका जिंकण्यासाठी आणखी प्रयत्न करावे लागणार आहेत. केरळमध्ये नेहमीप्रमाणे कम्युनिस्टांची डावी आघाडी व काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त आघाडी यांच्यात पारंपरिक लढत होण्याची चिन्हे आहेत. सबरीमाला मंदिरातून मूर्तींच्या साडेचार किलो वजनाच्या सोन्याच्या कवच चोरी प्रकरणी तेथील ट्रस्टचे अधिकारी संशयाच्या घेऱ्यात सापडले आहेत.

अनेक हिंदू भाविक हे मुख्यमंत्री विजयन यांच्या सरकारचे अपयश मानत आहेत. मात्र, याचा लाभ भाजपला होईल, की सत्तेत पुनरागमन करण्याची संधी असलेल्या काँग्रेसप्रणित आघाडीला केरळमध्ये शून्य अस्तित्व असलेल्या भाजपने तिरुअनंतपुरममध्ये महापौरपदाची निवडणूक जिंकणे हा पक्षासाठी शुभ संकेत आहे. आसाममध्ये तिखट हिंदुत्वाचा यशस्वी प्रयोग करीत हेमंत बिस्वा सर्मा यांनी सत्तेवर चांगलीच मांड ठोकल्याने कधीकाळी सहज सत्ता देणारे हे राज्य काँग्रेस व आसाम गण परिषदेच्या हातातून सद्यस्थितीत तरी निसटल्यात जमा आहे. या निवडणुकांबरोबरच महाराष्ट्रात बारामती व राहुरी येथे पोटनिवडणूक होत आहे. अजित पवार यांचा अपघाती मृत्यू व शिवाजी कर्डिले यांचे निधन यामुळे होणाऱ्या या निवडणुका बिनविरोध करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. विरोधी पक्षांची ताकद लक्षात घेता या प्रयत्नांना पाठबळ देणे श्रेयस्कर.

# बीडमध्ये एसटी महामंडळाच्या एनसीएमसी कार्ड प्रकल्पाला ब्रेक

## ६० पैकी ५७ एजंट्सचे आयडी प्रलंबित, लाखोंची गुंतवणूक अडकली, सवलतीपासून नागरिकही वंचित

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एस.टी.) आणि एबीक्स कॅश प्रा.लि. यांच्यातील करारानुसार महामंडळाच्या बसमधून सवलतीत प्रवास करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या नॅशनल कॉमन मोबिलिटी (एनसीएमसी) कार्ड वितरण प्रकल्पाला बीड जिल्ह्यात अक्षरशः ब्रेक लागल्याचे चित्र समोर आले आहे. जिल्ह्यातील एजंट्सनी मोठ्या अपेक्षेने व आर्थिक गुंतवणुकीसह या योजनेत सहभाग घेतला असतानाही प्रशासनाच्या दिरंगाईमुळे हा प्रकल्प रखडल्याची गंभीर बाब उघडकीस आली आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यात एकूण ६० एजंट्सनी कार्ड सुविधेसाठी नोंदणी केली आहे. या सर्व एजंट्सनी आवश्यक असलेले मशीन व आयडी शुल्क 'एचजेआर प्रा. लि.' मार्फत संबंधित विभागाकडे नियमानुसार सुमारे ३० हजार जमा केले आहेत. जे ना परतावा आहेत. अनेक एजंट्सनी या प्रक्रियेसाठी कर्ज काढून किंवा वैयक्तिक बचत वापरून गुंतवणूक केली असल्याचेही समजते. मात्र, रक्कम भरून बराच कालावधी उलटूनही केवळ ७ एजंट्सचे आयडी कार्यान्वित झाले असून, उर्वरित तब्बल ५७ आयडी अजूनही पेंडींग अवस्थेत आहेत. त्यामुळे एजंट्समध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या विलंबामुळे एजंट्सना अपेक्षित व्यवसाय सुरू करता आलेला नाही. मशीन निष्क्रिय अवस्थेत पडून असून गुंतवलेली रक्कम अडकली आहे. परिणामी अनेक एजंट्स आर्थिक अडचणीत सापडले असून, काहींवर कर्जाचा ताणही वाढत आहे. यासोबतच, प्रवाशांनाही या प्रकल्पाचा फटका बसत आहे. एनएमसी कार्डच्या माध्यमातून कॅशलेस आणि सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार होती, मात्र प्रकल्पच रखडल्यामुळे प्रवाशांना या सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे. एजंट्सच्या मते, एबीक्स कॅश प्रा.लि.तसेच संबंधित तांत्रिक विभागाकडून कामाला अपेक्षित गती मिळत नाही. वारंवार पाठपुरावा करूनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. दरम्यान, संतप्त एजंट्सनी एस.टी. महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांकडे निवेदन सादर करून या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. उर्वरित ५७ एजंट्सचे आयडी व मशीन लवकरात लवकर कार्यान्वित करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देत प्रलंबित कामे पूर्ण केली नाहीत, तर एजंट्सकडून आंदोलनाचा इशाराही दिला जात आहे. त्यामुळे आता एस.टी. महामंडळ आणि संबंधित कंपनी या प्रश्नावर कितपत गांभीर्याने पावले उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नंतर नोंदणी करून जास्तीचे पैसे देवून आयडी घेतले

काही एजंटानी नंतरच्या काळात नोंदणी केली आणि जास्तीचे पैसे दिल्याने अशा एजंटांना तात्काळ आयडी सुरू करून देण्यात आले आहेत, असे सांगितले जात आहे. आयडी मिळविण्यासाठी नियमानुसार ३० हजार फी आकारण्यात आलेली आहे मात्र काह एजंटांनी ४० ते ४५ हजार रूपये देत आयडी मिळविले आहेत. याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# ज्ञानभूमी ज्ञानाचे प्रतीक व्हावी-डॉ.भीमराव आंबेडकर

**अंबड । प्रतिनिधी**

१५ मार्च रोजी महात्मा फुले नगर ,अंबड येथील ज्ञानभूमी बुद्ध विहार येथे भारतीय बौद्ध महासभेच्या कार्यक्रमाचे आयोजना वेळी डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी व्यक्त केले. सकाळी अंबड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प माला अर्पण करून तेथे डॉ. भिमराव आंबेडकर यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर समता सैनिक रॅलीस सुरुवात होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला घालून रैली ज्ञानभूमी महात्मा फुले नगर येथे पोहोचली. बँड पथक, समता सैनिक दलातील पुरुष व महिला सैनिक शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी झाले होते .रॅलीमध्ये अंबड शहरातील व अंबड बाहेरील पंचक्रोशीतून आलेले अनेक बौद्ध उपासक उपासिका बाल बालिका यांनी रॅलीमध्ये भाग घेतला होता. ज्ञानभूमी येथे आगमन होताच तेथे पुज्य भंते राजरत्न थेरो यांनी तयार केलेल्या माया ध्वजाचे डॉ. भिमराव आंबेडकर यांच्या शुभ हस्ते उदघाटन करण्यात आले,तेथे उपस्थित ३०० समता सैनिक दलातील सैनिकांनी डॉक्टर भीमराव आंबेडकर यांना लेफ्टनंट कर्नल कुणाल



दहिवले यांच्या नेतृत्वात मानवंदना दिली त्यानंतर भगवान गौतम बुद्धाच्या पुतळ्याच्या कोनशिलाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभा तालुका कार्यकारणी फलकाचे याप्रसंगी अनावरण करण्यात आले .ज्ञानभूमी बुद्ध विहार समितीच्या फलकाचे सुद्धा अनावरण करण्यात आले. विचार मंचावर मान्यवराचे आगमन झाल्यानंतर भगवान बुद्ध भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले .उपस्थित भिक्खू राजरत्न थेरो अंबड यांना क्षमा याचना केल्यानंतर त्यांनी उपस्थित जनसमुदायास त्रिशरण व पंचशील दिले. कार्यक्रमात डॉ.भीमराव आंबेडकर यांनी विचार मांडताना अशा व्यक्ती केली की ,सर्वांनी मिळून ही ज्ञानभूमी विकसित करावी, येथील यशवंत वाचनालय हे आवश्यक ग्रंथासहित इ ग्रंथालय निर्माण व्हावे. वाचनालयाचा स्त्री-पुरुषांनी उपयोग करून यशवंत व गुणवंत व्हावे त्यांच्या हातून समाजाची गौरवस्पद सेवा घडावी. येथील परिसरात योग्य प्रकारे वृक्षारोपण करून हा परिसर हिरवा गार करावा .आर्किटेकच्या सल्ल्याने येथे भव्य वस्तू निर्माण व्हावी .येथे तालुका स्तरापासून जिल्हास्तरीय, विभागीय स्तर,राज्यस्तरीय वेगवेगळ्या २४ प्रकारची शिबिर बाराही महिने आयोजित करण्यात यावी. अशी अपेक्षा व्यक्त केली .कार्यक्रमास आदरणीय राजाराम बडगे ट्रस्टी बीएसआय आदरणीय किशोर जोहरे राज्य संघटक, अमरसिंग ढाका राज्य संघटक ,जालना जिल्हा भारतीय बौद्ध महासभेचे पूर्व चे अध्यक्ष आयु. महिंद्र बनकर पश्चिम विभागाचे अध्यक्ष आयु.राजेश सदावर्ते , जिल्हा कार्यकर्त्यातील सर्व सन्माननीय सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते .त्याचप्रमाणे जालना जिल्हा महिला अध्यक्ष ज्योतीताई खरात यांची पण उपस्थिती होती .कार्यक्रमास लेफ्ट. कर्नल कुणाल दहिवले मेजर एकनाथ बोर्डे मेजर आनंदा भेजे मेजर राजाभाऊ आठवले,समता सैनिक दलातील सर्व सैनिक तालुक्यातील समता सैनिक दल पुरुष महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. जिल्ह्यातील तालुका भोकरदन तालुका जाफराबाद तालुका बदनापूर परतुर मंठा घनसांगी अंबड या आठही तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष तालुका सरचिटणीस व कार्यकारणातील सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंबड तालुका अध्यक्ष उत्तमराव येडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. डोणगावकर व ज्योतीताई खरात यांनी केले .आभार प्रदर्शन तालुका कोषाध्यक्षआयु. भास्करराव गाडगे यांनी केले. याप्रसंगी तालुका सरचिटणीस डॉ. त्वचारोग तज्ञ राहुल बागुल ,बी डी पवार, रामदास वाढवे ,भीमराव बनसोडे,शिवाजी गाडेकर, चंद्रकांत दिलपाक, डॉ.संदीप लाहोटी, मुक्तराम मगरे, रमेश वाघमारे ,शीला मगरे ,नगरसेवक शाहूल खरात,चंद्रमनी खरात, अभिजित गरबडे, विनोद जाधव, प्रशांत बागुल,सुनील खरात, संगीता ताई एडके ,प्राचार्य मिलिंद पंडित सर, राधबाई खरात, प्रा. भिमराव भिंगारदेव, अनिता डोंगरे,मनोहर पटेकर ,राहुल साळवे, वंचितचे सतीश खरात सुभाषराव ससाने,किशोर तुपे, मारवाडी युवा मंचाचे प्रदेशाध्यक्ष आदरणीय कैलास शेठ राठी ,संतोष जोशी ,डॉ. अमोल जाधव ,डॉ. प्रवीण पारगावकर ,भास्कर गाडेकर, रामचंद्र पानवाले, राजकुमार खरात, सुनील येटाळे ,सविताताई वाघमारे, चंद्रकला खंडागळे ,लताताई रुपवते, साहेबराव पटेकर, शिवाजीराव कांबळे ,प्रकाश घायतडक ,भागवतराव चाबुकस्वार, विजय ससाने, राहुल साळवे , इत्यादी मान्यवर उपस्थित होते . कार्यक्रमाची सांगता सरनतयांनी करण्यात आली.

# पोखरी सरपंचांच्या पत्नीची पोलीस पाटीलपदी निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील बीड-नगर मार्गावरील पोखरी गावातील सरपंच अंगद शिंदे यांच्या पत्नी हर्षाराणी अंगद शिंदे यांची पोलीस पाटीलपदी निवड झाली आहे. नुकत्याच पार पडलेल्या पोलीस पाटील परीक्षेत उल्लेखनीय गुण मिळवत त्यांनी हे यश संपादन केले आहे.**

हर्षाराणी शिंदे या उच्चशिक्षित असून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षणासोबत डी.एड. शिक्षणही पूर्ण केले आहे. त्यांच्या या यशामुळे पोखरी गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून गावकऱ्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पोखरी ग्रामपंचायतीचे सरपंच अंगद शिंदे हे मराठवाडा भूषण लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कुटुंबातील सदस्याने पोलीस पाटीलपद मिळविल्याने त्यांच्या समर्थकांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. दरम्यान, या



निवडीबद्दल सरपंचांचे मित्रपरिवार, सरकार ग्रुप तसेच सचिन अण्णा लोखंडे मित्र मंडळ यांनी हर्षाराणी शिंदे यांचे स्वागत करत शुभेच्छा दिल्या आहेत. नुकत्याच झालेल्या या परीक्षेचे निकाल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पारदर्शक पद्धतीने जाहीर केल्याने उमेदवारांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

पान १ वरून...

### केंद्राकडून अडते, सहकारी

कमिशनमध्येही वाढ केली आहे. गहू खरेसाठी प्रतिक्विंटल २७ रुपयांवरून २९.७९ रुपयांपर्यंत कमिशन केले आहे. तर धान खरेदीसाठी कमिशन प्रतिक्विंटल ३२ रुपयांवरून ३५.३० रुपयांपर्यंत वाढवण्यात आले आहे. तर आधुनिक सायलोमध्ये ठेवण्यासाठी होणाऱ्या खरेदीसाठी कमिशनचा दर बाजार समितीमधील दराच्या ५० टक्केच राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे. सध्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अडत्यांच्या कमिशनचे दर राज्यनिहाय आणि संस्थानिहाय वेगवेगळे असतात. सरकारी खरेदी प्रक्रियेदरम्यान मध्यस्थी आणि शेतमाल एकत्रित करण्याशी संबंधित सेवा पुरवल्याबद्दल सहकारी संस्था, सोसायट्या, उप-एजंट आणि अडत्यांना कमिशन दिले जाते.

-----------

### रब्बीच्या ई-पीक पाहणीला

आहे. मात्र, आतापर्यंत रब्बी हंगामातील पिकांची केवळ ५५.६९ टक्के नोंदणी पूर्ण झाली आहे. सुमारे ४५ टक्के शेतकरी या नोंदणी प्रक्रियेपासून लांब आहेत. ही नोंदणी १०० टक्के पूर्ण व्हावी, या हेतूने सरकारने मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.पीक विम्यासह सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी ई-पीक पाहणी अत्यंत महत्त्वाची आहे.'' जमाबंदी आयुक्त आणि कृषी आयुक्त यांनी समन्वयाने काम करून ॲग्री स्टॅक मधील डेटाची नोंदणी तातडीने पूर्ण करावी,'' अशी सूचना प्रशासनाला केली असल्याचे सांगून बावनकुळे म्हणाले की, पीक पाहणीची पडताळणी अचूक आणि वेळेत व्हावी, यासाठी विशेष लक्ष दिले जाणार आहे.

-------------

### संगमनेरमध्ये सहावीतल्या मुलीवर

फेकले. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे मुलगी गंभीर जखमी झाली. घटनेनंतर मुलीच्या आरडाओरडीनंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेतली. जखमी मुलीला तात्काळ उपचारासाठी लोणी येथे हलविण्यात आले आहे. तिच्यावर उपचार सुरू असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. ॲसिड हल्ला करणारा आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वीच संगमनेर तालुक्यातील रणखांब येथे लग्नाला नकार दिल्याने एका मुलीवर प्राणघातक हल्ल्याची घटना घडली होती. त्यानंतर पुन्हा घडलेल्या या प्रकारामुळे कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

----------

### बीड : कामगार कार्यालयातील भ्रष्ट

नगरपालिका आणि काही ग्रामपंचायतींमध्येही घडला आहे. अशा १०० ते २०० संशयास्पद प्रकरणांसह काही नोंदींमध्ये व्हाईट हाऊस व बुर्ज खलिफा येथे काम केल्याचेही दाखवले गेले आहे. हा प्रकार कोट्यवधींचा घोटाळा असून बोगस कागदपत्रे व अधिकाऱ्यांच्या संगनमताची शक्यता लक्षात घेता सचिव स्तरावर स्वतंत्र चौकशी, दोषींवर गुन्हे आणि संपूर्ण रकमेची वसुली केली जावी. बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगार खात्यात झालेला घोटाळा हा कोरोना काळ आणि त्या अगोदर मृत झालेल्यांच्या बाबतचा आहे. त्या काळात मृत झालेले लोक परत जिवंत झाले आणि त्यांनी काम केले. त्यांना तसे प्रमाणपत्र दिले गेले. नंतर ते पुन्हा मयत झाले आणि त्यांच्या कुटुंबियांना अडीच लाखांचे अनुदान देण्यात आले. २०१३ मध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तीला अंबाजोगाई नगर परिषदेने मृत्यू प्रमाणपत्र दिलं. त्यानंतर त्यांनी याच व्यक्तीला दहा वर्षांनी म्हणजे २०२३ मध्ये ते शंभर दिवस एका व्यक्तीकडे कामाला होते, अशी नोंद आहे. कामगार म्हणून त्यांनी ऑनलाईन पोर्टलमध्येही नोंद केली आहे. कमलाकर मुडेगावकर या मृत झालेल्या व्यक्तीच्या नावे त्यांचे स्वयंघोषणा पत्रही दिले, की मी कामाला होतो. दहा वर्षानी ते वरून खाली कसे आले? परत मुडेगावकर यांना एक मृत्यू प्रमाणपत्र अंबाजोगाई नगर परिषदेनेच दिले. २०२३ मध्ये पुन्हा ते वारले. गजानन मुडेगावकर या त्यांच्या मुलाला स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यावर दोन लाखाच्या अनुदानाची रक्कमही पाठवली गेली.नगर पंचायती, नगरपालिका, नगर परिषदांमध्ये असे प्रकार झाले आहेत. काही ग्रामपंचायतीमध्येही असे खोटे प्रमाणपत्र दिले आहेत. माझ्या कानावर आलेल्या प्रकरणात अशी शंभर उदाहरणे आहेत. किमान दोनशे प्रकरण बीड जिल्ह्यात समोर आले आहेत. या घोटाळ्याच्या चौकशीसाठी सचिव स्तराच्या अधिकाऱ्याची समिती नेमून चौकशी करावी. दीड-लाख कामगारांची बीडमध्ये नोंद आहे. हे गंभीर प्रकरण असून दोनशे प्रकरणात २ लाख ३० हजार प्रत्येकी असा हा मोठा घोटाळा झाला असल्याचे सुरेश धस यांनी सभागृहात मांडले. यावर संबंधित खात्याचे मंत्री आकाश फुंडकर यांनी ऑफलाईन कामगारांच्या नोंदणी वेळी असे प्रकार घडल्याचे मान्य केले. आता ऑनलाईन नोंदी आणि बायोमेट्रीकमुळे याला आळा बसला आहे. सुरेश धस यांनी तक्रार केलेल्या प्रकरणांची तपासणी केली त्यात अपघाती मृत्यू एकच होता तो खरा होता हे स्पष्ट झाले आहे. इतर प्रकरणांची कागदपत्रे तपासली जात आहेत. ५३ प्रकरणात अनियमितता आढळून आलेले नाही. अपघातील मृत्यू झाल्यास पाच लाख, नैसर्गिक मृत्यूसाठी आपण कामगारांना दोन लाख रुपये अनुदान देतो. सुरेश धस यांनी त्यांच्याकडे असलेले पुरावे द्यावेत, एक स्वतंत्र अधिकारी नेमून या प्रकरणाची चौकशी करू, असे उत्तर फुंडकर यांनी सभागृहात दिले.

-----------

### विधानसभेत 'धर्मस्वातंत्र्य

केले. या नियमाचे पालन न झाल्यास धर्मांतर अवैध मानले जाण्याची शक्यता असते. ही अट केवळ प्रशासकीय नोंदी ठेवण्यासाठी आणि भविष्यात उद्भवू शकणारे संभाव्य कायदेशीर व सामाजिक वाद टाळण्यासाठी ठेवण्यात आली असल्याचे ते म्हणाले. बळजबरीने केलेल्या धर्मांतराबाबत नातेवाईक किंवा इतर व्यक्ती तक्रार दाखल करू शकतात. अनेक प्रकरणांमध्ये पीडित व्यक्ती स्वतः पोलिसांकडे जाण्याच्या स्थितीत नसतात, असे त्यांनी सांगितले. भोयर पुढे म्हणाले, हा कायदा प्रौढ व्यक्तींना आपला धर्म बदलण्याच्या अधिकारापासून वंचित करत नाही. तसेच संविधानाने धर्म स्वीकारण्याचे, त्याचे आचरण करण्याचे आणि त्याचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य प्रदान केले आहे. तथापि, फसवणूक, बळजबरी किंवा प्रलोभनांद्वारे केल्या जाणाऱ्या धर्मांतरांना आळा घालण्यासाठी कायदे करण्याचा अधिकार राज्याला असल्याचेही त्यांनी नमूद केले. चर्चेनंतर सभागृहाने महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २०२६ हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर केले. पीठासीन अधिकारी संजय केळकर यांनी हे विधेयक मंजूर झाल्याचे घोषित केले.

**सर्वांना समान कायदा लागू**

या कायद्याचा उद्देश कोणत्याही विशिष्ट धर्माला किंवा समुदायाला लक्ष्य करणे हा नसून, तो सर्वांना समान रीतीने लागू होईल. या कायद्याच्या अंमलबजावणीदरम्यान महिलांच्या अधिकारांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी विशेष काळजी घेतली जाईल. तसेच, महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अल्पवयीन व्यक्तींना सक्तीच्या किंवा फसवणुकीने केल्या जाणाऱ्या धर्मांतरांपासून सुरक्षित ठेवणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. जर एखाद्या बेकायदेशीर धर्मांतराच्या आधारे विवाह झाला आणि त्यातून अपत्याचा जन्म झाला, तर या विधेयकानुसार त्या अपत्याचा धर्म हा धर्मांतरापूर्वी आईचा जो मूळ धर्म होता, तोच मानला जाईल.

-----------

# आई नवसाई देवी मंदिराचा भूमिपूजन सोहळा व कीर्तन महोत्सव उत्साहात; मान्यवरांची उपस्थिती लाभणार

**बीड । प्रतिनिधी**

**श्रीक्षेत्र जरूड (ता. जि. बीड) येथे आई नवसाई देवी मंदिराच्या भव्य बांधकामाचा शुभारंभ भूमिपूजन सोहळ्याने करण्यात येणार असून, या पवित्र सोहळ्याचे आयोजन अत्यंत भक्तिभावाने करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविकांसाठी हा सोहळा विशेष आकर्षण ठरणार असून संत-महंतांच्या आशीर्वादाने व मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडणार आहे.**




गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी सकाळी ६ वाजता सर्व भाविकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात होईल. त्यानंतर सकाळी ९ ते ११ या वेळेत पंचक्रोशीतील विविध भजनी मंडळांकडून सुरेल भजनांचा कार्यक्रम सादर केला जाणार आहे. सकाळी ११ वाजता हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले असून, त्यानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. या सोहळ्याला मराठा संघर्षयोद्धा मा. श्री. मनोजदादा जरांगे पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. संत-महंतांच्या आशीर्वादामुळे या सोहळ्याला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त होणार आहे. कीर्तनासाठी ह.भ.प. रामायणाचार्य गणेश महाराज लोंढे (माऊलीदादा वारकरी शिक्षण संस्था, भेंडटाकळी) यांचे प्रभावी कीर्तन होणार असून, त्यांच्या वाणीतील आध्यात्मिक संदेशातून भाविकांना भक्तिरसाचा अनुभव घेता येणार आहे. ह. भ. प. नवसाई कृपांकित युवकीर्तनकार माऊली महाराज जरूडकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण सोहळा पार पडणार असून, त्यांच्या प्रेरणेमुळे कार्यक्रमाला विशेष आध्यात्मिक अधिष्ठान लाभणार आहे. या कार्यक्रमासाठी गावातील तसेच परिसरातील सेवाभावी व्यक्तींनी उत्स्फूर्त सहकार्य केले आहे. भंडारा, पाणी व्यवस्था, कीर्तन सोहळा तसेच इतर नियोजनात ग्रामस्थांचा मोठा सहभाग राहिला आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समस्त जरूड ग्रामस्थांनी व्यापक तयारी केली असून, सर्व भाविकांनी या पवित्र सोहळ्यास उपस्थित राहून भूमिपूजन, कीर्तन महोत्सव व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात



### अंबाजोगाई बसस्थानक झाले चकाचक
#### योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचा पुढाकार

अंबाजोगाई । प्रातिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सामाजिक बांधिलकी जपत प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी अंबाजोगाई बसस्थानक चकाचक केले. विद्यार्थ्यांनी बसस्थानक परिसरातील झुडपे, गवत काढले तसेच हातामध्ये झाडू घेऊन परिसर पुर्णपणे स्वच्छ केला. काम करणाऱ्या विद्यार्थ्याना बसस्थानकातील कर्मचाऱ्यांनीही मदत केली.अवघ्या दोन तासात बस स्थानक चकाचक स्वच्छ झाले. जवळपास १५० विद्यार्थी स्वच्छता मोहिमेत सक्रीय होते. या उपक्रमाकरिता प्रथम वर्षाचे विभाग प्रमुख प्रा.नारायण सिरसाट, यंत्र अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा.शाम गडदे, प्रा.प्रियंका गंभीरे, प्रा.निशांत मस्के,डॉ. संकेत तोरंबेकर, ज्ञानेश्वर धुमाळ, विश्वजीत इंगळे,योगेश देशपांडे आदींनी उस्फुर्तपणे सहभाग घेऊन मार्गदर्शन केले. यावेळी अंबाजोगाई आगार प्रमुख अमर राऊत व स्थानक प्रमुख हरिदास गिरी,योगेश्वरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे उपस्थित होते.



### छोटेवाडीत दशरथ महाराज अंभोरे यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता

माजलगांव । प्रतिनिधी

तालुक्यातील छोटेवाडी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची दशरथ महाराज अंभोरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली.सप्ताह काळात वेगवेगळ्या विषयांवर विविध नामवंत कीर्तनकारांकडून समाजप्रबोधन करण्यात आले. अंभोरे महाराज यांनी कीर्तनातून आईवडिलांचा सांभाळ करावा, असे आवाहन केले. आईवडिलांची सेवा हाच धर्म असल्याचे त्यांनी सांगितले.अंभोरे महाराजांनी भगवान श्रीकृष्णाने अवतार घेतल्यापासून बालपणी केलेल्या लीलांचे वर्णन त्याचप्रमाणे अवतार संपेपर्यंत जीवनप्रवासावर प्रबोधन केले. छोटेवाडी येथील सप्ताह समितीच्या वतीने भागवताचार्य शाम महाराज चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.दहीहंडीच्या कार्यक्रमाने सप्ताहाची सांगता करण्यात आली. प्रल्हाद इंगळे,रंजित जाधव,भगवान बिडवे,बालासाहेब सोळंके यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते.

कार्यक्रम चैतन्यदायी करण्यासाठी सरपंच अंगदराव कटके, दत्तात्रय बागल, वैजनाथ कटके, राजकुमार आब्दल, रमेश नावडकर,भागवत इंगळे,सचिन प्रधान,संदीप सोळंके, बाळासाहेब कटके, माणीक पांचाळ व समस्त ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले

# पाटोदा महसूल विभागाचा मोठा घोटाळा उघड
## घरकुलच्या नावाखाली कोट्यवधींचे बेकायदेशीर प्लॉटिंग!

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा महसूल विभागातील एक खळबळजनक प्रकरण समोर आले असून, घरकुल योजनेच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचे बेकायदेशीर प्लॉटिंग करण्यात आल्याचा गंभीर आरोप होत आहे. या प्रकरणामुळे महसूल विभागाच्या अब्रूचे वाभाडे निघाले असून, यामध्ये अनेक अधिकारी आणि भूमाफियांनी संगनमताने हा व्यवहार केल्याचे उघड होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घरकुल मंजूर नसलेल्या व्यक्तींच्या नावे घरकुलासाठी जमीन खरेदीची परवानगी कशी मिळाली, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे अंमळनेरमध्ये पुणे-मुंबई पेक्षाही मोठा घोटाळा झाल्याची चर्चा असून, यात नियम धाब्यावर बसवून जमिनीचे तुकडे पाडण्यात आले आहेत.

अधिकारी आणि भूमाफियांचे साटेलोटे: या बेकायदेशीर प्लॉटिंगच्या कामात महसूल विभागातील अधिकारी आणि स्थानिक भूमाफियांनी मोठे आर्थिक व्यवहार केल्याचा संशय आहे.

नियमबाह्य परवानगी: ज्यांच्या नावावर घरकुल मंजूर नाही, त्यांना जमिनीच्या खरेदी-विक्रीची परवानगी उपविभागीय अधिकारी () कार्यालयाकडून कशी मिळाली? हा तपासाचा मुख्य विषय बनला आहे.

दुय्यम निबंधकांचे दुर्लक्ष: जमीन खरेदी-विक्रीची नोंदणी करताना दुय्यम निबंधकांनी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी न करताच डोळेझाक केल्याचा आरोपही या बातमीत करण्यात आला आहे.

कठोर कारवाईची मागणी: या घोटाळ्यामुळे शासनाचा मोठा महसूल बुडाला असून, दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे. या प्रकरणाच्या सखोल तपासानंतर अनेक बड्या धेंडांचे धाबे दणाणले असून, महसूल विभागातील बोगसगिरी आता चव्हाट्यावर आली आहे. यामुळे येणाऱ्या काळात प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जिल्हा परिषद शिक्षकांची ‘बीएलओ’ नियुक्ती ग्रामीण शिक्षणावर परिणामकारक

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी बीड विवेक जान्सन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या मतदार यादी पुनर्निरीक्षण () मोहिमेसाठी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी () म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दि.१० मार्च ते २० मार्च या कालावधीत ही मोहीम राबवली जात असून, शिक्षकांना पूर्णवेळ बीएलओ ड्युटीसाठी पाठविण्यात आले आहे.

या निर्णयामुळे ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता तीव्र झाली असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा थेट परिणाम होत आहे. अनेक ठिकाणी १ किंवा २ शिक्षकांवर संपूर्ण शाळेचा कारभार सांभाळण्याची वेळ आली आहे. परिणामी शिक्षकांवर शारीरिक व मानसिक ताण वाढत असून, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार पालक व शिक्षकांकडून होत आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी यावर तीव्र प्रतिक्रिया देताना सांगितले की, परीक्षा कालावधी अगदी जवळ आलेला असताना शिक्षकांची बीएलओ म्हणून नियुक्ती करणे म्हणजे




शैक्षणिक गुणवत्तेला हरताळ फासण्यासारखे आहे.

लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील पालक लेनाजी गायकवाड यांनी सांगितले की, ‘‘आधीच शिक्षकांची संख्या अपुरी आहे. त्यात बीएलओसाठी शिक्षकांना पाठवल्यामुळे एकाच वर्गात दोन वर्गांचे विद्यार्थी शिकत आहेत. पुढील महिन्यात परीक्षा असल्याने आमच्या पाल्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. प्रशासनाने पर्यायी उपाययोजना करावी.’’

शिक्षकांवर वाढता ताण

लिंबागणेश केंद्रीय प्राथमिक शाळेतील सहशिक्षिका सुवर्णा गिते यांनी सांगितले की, शाळेत १२२ विद्यार्थी असून ४ वर्ग आहेत. त्यापैकी २ शिक्षकांची बीएलओ म्हणून नियुक्ती झाल्यामुळे उर्वरित शिक्षकांना एकत्रित वर्ग घेऊन अध्यापन करावे लागत आहे. त्यामुळे शारीरिक व मानसिक ताण वाढला आहे. दरम्यान, पालक व शिक्षकांनी प्रशासनाने या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे.

## आजपासून युसूफवडगांव येथे रामनाम सप्ताह व रामकथा सोहळ्यास सुरुवात

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुकातील युसूफवडगांव येथे श्रीराम पुन:प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन व श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने अखंड रामनाम सप्ताह व रामकथा सोहळयास आजपासून सुरूवात होत आहे.



गेल्या १७ वर्षापासुन युसूफवडगांव अर्थात रामवडगांव येथे ग्रामदैवत असलेले प्रभु श्री राम यांच्या पुन:प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिना निमित्ताने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंड रामनाम सप्ताह व रामकथा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.याही वर्षी हा सप्ताह आजपासून चालु होणार असुन रामकथा प्रवक्त्या म्हणुन आळंदी देवाची येथील ह.भ.प.सोनालीताई महाराज यांची उपस्थिती असणार आहे तर सात ही दिवस विविध किर्तनकारांचे किर्तन असणार आहेत यामध्ये ह.भ.प.श्री.अनिल महाराज महाकाले.हभप श्री,महंत शांतीगीरी महाराज,ह.भ.प.भागवताचार्य संगिताई कोरडे महाराज,श्री,ष.ब्र १०८ श्री गुरू.निळकंठ शिवाचार्य महाराज,रामायणाचार्य ह.भ.प महेश महाराज महाजन,ह.भ.प श्री,संस्कार खंडागळे महाराज,रामायणाचार्य ह.भ.प.राजन महाराज काशीद यांचे किर्तन असणार आहेत तर बुधवार दि.२५ मार्च रोजी ह.भ.प श्री,गुरूवर्य प्रकाश महाराज बोधले यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन होईल तद्नंतर उपस्थिती भाविक भक्तांसाठी गावकऱ्यांच्या वतीने महानिमित्ताने भोजन होईल तरी पंचक्रोशीतील सर्व रामभक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच,उपसरपंच,ग्रा.पंचायत सदस्य व गावकरी यांनी केले आहे.


## वाघीरा जि.प.शाळेच्या वर्गखोल्या परवानगी न घेता पाडल्या

### फौजदारी गुन्हा दाखल करा, बिओचे मुख्याध्यापकाला पत्र

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील वाघीरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे एक ते चौथीपर्यंत वर्ग असून जवळपास ६० ते ६२ पटसंख्या असून मात्र या ठिकाणी असलेल्या शाळेमध्ये वर्ग खोल्यांची पूर्वपरवानगी न घेता शाळा खोल्या पाडल्या असून यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघीर वाघिरा याठिकाणी एक ते चार वर्ग असून ६० ते ६२ पटसंख्या आहे मात्र या ठिकाणी शाळेला एकूण ११ वर्ग खोल्यापैकी सहा वर्ग खोल्या पाडल्या असल्याचे तसेच एक वर्ग खोली किचन शेड म्हणून तर एक खोली अडगळीचे सामान असून तीन वर्ग खोल्यांमध्ये अध्यापनाचे कार्य सुरू असल्याचे कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता यांनी अहवालात



नमूद केले आहे शाळेतील असणाऱ्या सहा वर्ग खोल्या या कुठल्याही प्रशासकीय परवानगीशिवाय पाडलेल्या आहेत वर्गखोल्या विनापरवानी पाडणाऱ्या व्यक्ती विरुध्द पोलीस पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा दाखल करून त्याची एक प्रत गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पाटोदा. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाटोदा. शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद बीड यांना द्याव्यात याबाबत टाळाटाळ अथवा तो हलगर्जीपणा होणार नाही याची नोंद घ्यावी असे गटशिक्षणाधिकारी पाटोदा यांनी जा.क्र./ गशिअ/आस्था / करावी/१८५/२०२६ दि.४/३/ २०२६ रोजी दिलेल्या पत्रामध्ये मुख्याध्यापकाला म्हटले आहे यामुळे मात्र शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

## डॉ. दिवाकर गुळजकर यांचे निधन
### शोकाकुल वातावरणात मंगळवारी अंत्यसंस्कार

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील प्रसिद्ध व ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ तथा फिनिक्स हॉस्पिटलच्या संचालक डॉ. दिवाकर गुळजकर यांचे मंगळवार पहाटे २ वाजून २७ मिनिटांनी अल्पशा आजारामुळे दु:खद निधन झाले. मृत्यू समय ते ५३ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे बीड जिल्ह्यातील वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.



डॉ. गुळजकर यांनी अनेक वर्षे वैद्यकीय क्षेत्रात कार्य करत रुग्णसेवेला प्राधान्य दिले. आपल्या सेवाभावी वृत्तीमुळे आणि रुग्णांप्रती असलेल्या आपुलकीमुळे त्यांनी समाजात एक विश्वासार्ह व लोकप्रिय डॉक्टर म्हणून ओळख निर्माण केली होती. त्यांच्या अकाली निधनामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांचा अंत्यविधी दिनांक १७मार्च रोजी सकाळी ठीक ११वाजता आमरधाम, मोंढा रोड, बीड येथे करण्यात आले. यावेळी समाजातील सर्व स्तरातील प्रचंड समुदाय उपस्थित होता.

त्यांच्या पश्चात आई,पत्नी,एक मुलगा,एक मुलगी असा परिवार आहे. अत्यंत मित भाषी आणि शांत स्वभावाचे डॉक्टर गुळजकर यांचा जनसंपर्क दांडगा होता. त्यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून शोक व्यक्त करण्यात येत आहे. गुळजकर परिवाराच्या दु:खात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

## जिल्ह्यात पथदिवे घोटाळा ‘संगनमताची टोळी’ सक्रिय?
### सखोल चौकशीची जोरदार मागणी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रामध्ये मागील काही वर्षांपासून बसविण्यात आलेल्या पथदिवे / स्ट्रीट लाईट कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शासनाच्या अंदाजपत्रकात उच्च दर्जाचे दिवे, मजबूत / पोल, योग्य व व्यवस्था नमूद असताना प्रत्यक्षात अनेक ठिकाणी अतिशय हलक्या दर्जाचे, कमी वॅटचे व निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून कामे उरकण्यात आली आहेत. काही ठिकाणी इस्टिमेटपेक्षा कमी दिवे बसविणे, अपूर्ण कामे ठेवणे तसेच पोल ऐवजी साधे लोखंडी पोल वापरण्यात आल्याचे प्रकारही समोर येत आहेत.

या संपूर्ण प्रकरणामध्ये केवळ अनियमितता नसून ठरवून तयार केलेली ‘‘बोगस कामांची टोळी’’ जिल्ह्यात सक्रिय असल्याचा गंभीर संशय व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित कंत्राटदार, काही स्थानिक अधिकारी, कर्मचारी व अभियंते यांच्या संगनमताने शासनाच्या निधीवर डल्ला मारला जात असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. बाजारामध्ये २३ लाखात मिळणारे साहित्य १० लाखांच्या इस्टिमेटमध्ये दाखवून मोठ्या



प्रमाणात आर्थिक घोटाळा करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही.

विशेष म्हणजे, मागील २ ते ३ वर्षांपासून अशा प्रकारची बोगस कामे संपूर्ण जिल्ह्यात पसरलेली असून ही टोळी संगनमताने कामे उचलून निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून शासनाची फसवणूक करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

## आरटीई प्रवेशासाठी मुदतवाढ; १ कि.मी.ची अट शिथिल, आता ३ व ५ किमीपर्यंत शाळांचे पर्याय

बीड । प्रतिनिधी

शिक्षणाचा हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमधील २५ टक्के राखीव प्रवेशासाठी सुरू असलेल्या ऑनलाइन प्रक्रियेत महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्देशानुसार शाळेच्या अंतरासंबंधीची एक किलोमीटरची अट शिथिल करण्यात आली असून आता पालकांना तीन व पाच किलोमीटरपर्यंतच्या शाळांचे पर्याय निवडण्याची संधी मिळणार आहे.तसेच अर्जामध्ये दुरुस्ती किंवा नवीन अर्ज भरण्यासाठी २५ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अशी माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे.

दरम्यान, १२ फेब्रुवारी रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार आरटीई प्रवेशासाठी पालकांना केवळ निवासस्थानापासून एक किलोमीटर अंतरातील शाळाच निवडण्याची अट घालण्यात आली होती. मात्र, या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवित एक किलोमीटरची सक्ती योग्य नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे शासनाने नियमांमध्ये सुधारणा करून पालकांना अधिक अंतरावरील शाळांचे पर्याय उपलब्ध करून द्यावेत, असे आदेश न्यायालयाने दिले.



या आदेशानुसार शिक्षण विभागाने आरटीई प्रवेशासाठीच्या ऑनलाइन प्रणालीमध्ये आवश्यक तांत्रिक बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. आता प्राधान्याने एक किलोमीटर, त्यानंतर तीन किलोमीटर आणि पाच किलोमीटर अंतरातील शाळांचे पर्याय पालकांना निवडता येणार आहेत. तसेच १६ मार्च २०२६ पर्यंत ज्या पालकांनी आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरले आहेत, त्यांना अर्ज अनकन्फर्म करून पुन्हा कन्फर्म करण्याची सुविधा पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी संबंधित पालकांना पोर्टलवर पॉप-अप विंडोच्या माध्यमातून सूचना देण्यात येणार आहे. दरम्यान, न्यायालयाच्या आदेशानुसार सुधारित नियम लागू करत ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया तातडीने सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता अधिक अंतरावरील शाळांचे पर्याय उपलब्ध झाल्याने आरटीई प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या पालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्याचबरोबर अगोदर दाखल केलेले विद्यार्थ्यांना अर्ज अपडेट करता येणार असल्याची माहिती मनोज जाधव यांनी दिली आहे.

२२ शाळांचे लोकेशन आरटीई पोर्टलवर चुकले; गोरगरीब विद्यार्थी प्रवेशाला मुकले

बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई, आष्टी व केज तालुक्यातील तब्बल २२ शाळांचे लोकेशन आरटीई पोर्टलवर चुकीचे अपलोड झाल्याने अनेक विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर परिणाम होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.आरटीई प्रवेश प्रक्रियेअंतर्गत शाळांची नोंदणी व व्हेरिफिकेशन करण्यासाठी जवळपास एक महिन्याचा कालावधी देण्यात आला होता. तरीही या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात त्रुटी राहिल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे अंबेजोगाई तालुक्यात सर्वाधिक शाळांचे लोकेशन चुकीचे नोंदवले गेले आहे. त्यामुळे शाळेजवळ राहणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनाही त्या शाळेत अर्ज करता येत नसल्याने पालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

लोकेशन चुकले की जाणीवपूर्वक चुकवले? मनोज जाधव

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्ते मनोज जाधव यांनी सांगितले की, आरटीई पोर्टलवर शाळांचे लोकेशन चुकीचे नोंदवणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. एखाद्या शाळेचे स्थलांतर करायचे असल्यास त्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करून मंत्रिमंडळाची मान्यता घेतल्यानंतरच शासन निर्णयाद्वारे शाळेचे स्थलांतर करता येते. त्यानंतरच शाळेचे लोकेशन बदलणे शक्य असते.

## इथेनॉल प्रकल्पांसाठी व्याज अनुदान वाढवा
### खा. सोनवणे यांनी घेतली केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट

नवी दिल्ली । वृत्तसेवा

बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन एथेनॉल प्रकल्पांसाठी केंद्र सरकारच्या व्याज अनुदान योजना २०१८ संदर्भातील विविध प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधले.



या भेटीदरम्यान पुणे येथील वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन यांच्या निवेदनाच्या आधारे साखर उद्योगासमोरील अडचणी मांडण्यात आल्या. देशात इथेनॉल मिश्रण कार्यक्रम (-२०) यशस्वी करण्यासाठी साखर उद्योगाने मोठे योगदान दिले असून, एथेनॉल प्रकल्पांमध्ये सुमारे ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचा सुमारे ४० टक्के वाटा असल्याचे खा. सोनवणे यांनी नमूद केले.व्याज अनुदान योजनेअंतर्गत अनेक साखर कारखान्यांना दोन वर्षांहून अधिक कालावधी उलटूनही अनुदानाची रक्कम मिळालेली नाही, याकडे त्यांनी गृहमंत्र्यांचे लक्ष वेधले. बँकांनी कर्जावरील व्याजाची वसुली केलेली असतानाही संबंधित अनुदान प्रलंबित असल्यामुळे साखर उद्योग आर्थिक अडचणीत सापडल्याचे त्यांनी स्पष्ट केले.तसेच, गेल्या सहा वर्षांपासून साखरेचा किमान आधारभूत दर (एमएसपी) स्थिर असून ऊस उत्पादकांना एफआरपीची रक्कम १४ दिवसांत देण्याची सक्ती असल्याने साखर कारखान्यांवर आर्थिक ताण वाढत आहे. महाराष्ट्रातील एफआरपी थकबाकी सुमारे ५ हजार कोटी रुपयांवर पोहोचल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.दरम्यान, व्याज अनुदान योजना २०१८ ची मुदत वाढविणे तसेच प्रलंबित अनुदान तातडीने मंजूर करणे, अशी मागणी खा. सोनवणे यांनी गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे केली.यावर गृहमंत्री अमित शाह यांनी विषयाची सकारात्मक दखल घेत संबंधित मंत्रालयाशी चर्चा करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती खा. सोनवणे यांनी दिली.

cmyk

# देशी गोवंश संवर्धनाला चालना देण्यासाठी गौ-टेक परिषद

## २० ते २३ मार्च दरम्यान आयोजन, पशुपालक, पशुतज्ज्ञ आणि प्रक्रिया उद्योजक येणार एकत्र

पुणे / प्रतिनिधी

कृषी, आरोग्य आणि संस्कृतीच्या दृष्टीने देशी गोवंशाचे संगोपन महत्त्वाचे मानले जाते. देशी गोवंश संवर्धन, संशोधन आणि त्यावर आधारित प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी पुण्यात 'गौ-टेक २०२६' आंतरराष्ट्रीय शिखर परिषद आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या माध्यमातून देशभरातील पशुपालक, पशुतज्ज्ञ आणि प्रक्रिया उद्योजक एकत्र येणार असून, देशी गोवंश संगोपन व व्यवस्थापनातील नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा संकल्प आहे, अशी माहिती राष्ट्रीय कामधेनू आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. वल्लभभाई कथिरिया यांनी दिली. 'जीसीसीआय' आणि महाराष्ट्र गौसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे २० ते २३ मार्च दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन कृषी महाविद्यालयाच्या मैदानामध्ये होणार आहे. रविवारी (ता. १५) प्रदर्शन स्थळाच्या भूमिपूजन प्रसंगी डॉ. कथिरिया यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे



अध्यक्ष शेखर मुंदडा, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. शेखर मुंदडा म्हणाले, ''देशी गोवंशाच्या संवर्धनाच्या बरोबरीने गो आधारित उद्योग, सेंद्रिय शेती, विज्ञान आणि तंत्रज्ञानाला गती देण्यासाठी या प्रदर्शनाच्या निमित्ताने गोशाळा संमेलन होणार आहे. यामध्ये देशी गोवंशाचे शास्त्रीय पद्धतीने संगोपन, प्रक्रिया उद्योग, सेंद्रिय शेती आणि उत्पादनांच्या विक्रीबाबत विविध तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

याचबरोबरीने पशुपालकांसाठी देखील विशेष चर्चासत्राचे आयोजन केले आहे. या प्रदर्शनात विविध गो उत्पादने, शेणापासून तयार केलेला रंग, विटा, विविध वस्तू निर्मितीसाठी यंत्र सामुग्री, दुग्धजन्य पदार्थांचे स्टॉल असणार आहेत.'' खासदार डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, की येत्या काळात देशी गोवंशाच्या संगोपनासोबत सेंद्रिय शेती, ऊर्जा निर्मिती, प्रक्रिया उद्योगांना चालना मिळणार आहे. याचा ग्रामीण अर्थव्यवस्थेला फायदा होईल. शहरी ग्राहक आणि ग्रामीण उद्योजकांना जोडण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण असणार आहे. या वेळी उद्योजक कृष्णकुमार गोयल, अण्णा भरेकर, डॉ. नितीन मार्कंडेय, रमेशभाई रूपारेलिया, भरतभाई राजपुरोहित, संजय भोसले, डॉ. कुलकर्णी, महेंद्र देवी आदी मान्यवर उपस्थित होते

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८५०: हेन्री वेल्स आणि विल्यम फार्गो यांनी 'अमेरिकन एक्सप्रेस'ची स्थापना केली.
१९१९: रौलेट अ‍ॅक्ट पास झाला
१९२२: महात्मा गांधींना असहकार आंदोलनाबद्दल ६ वर्षे तुरूंगवास
१९४४: नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेने ब्रह्मदेशमार्गे प्रवेश करुन भारताच्या ईशान्य सीमेवर ब्रिटिशांचा पाडाव करुन तिरंगा फडकावला.
१९६५: अंतराळवीर अलेक्सी तिओनोवा हा अंतराळात चालला.
१९६९: 'कॉसमॉस' हे मानवविरहित अवकाशयान रशियाने याच दिवशी अवकाशात सोडले
२००१: सरोदवादक अमजद अली खान यांना 'गंधर्व पुरस्कार' तर तर बंगाली अभिनेत्री सावित्री चटर्जी यांना 'अप्सरा पुरस्कार' जाहीर.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५९४: शहाजी राजे भोसले (मृत्यू: २३ जानेवारी १६६४)
१८५८: रुडॉल्फ डिझेल – डिझेल इंजिनचा संशोधक (मृत्यू: १९१३)
१८६७: महादेव विश्वनाथ धुरंधर – आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार व पोस्ट कार्ड आर्टिस्ट, कलेला वाहून घेतलेल्या या चित्रकाराने सुमारे ५,००० हून अधिक चित्रे काढली. (मृत्यू: १ जून १९४४)
१८६९: नेव्हिल चेंबरलेन – इंग्लंडचे पंतप्रधान (मृत्यू: ९ नोव्हेंबर १९४०)
१८८१: वामन गोपाळ तथा 'वीर वामनराव' जोशी – स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार, 'राष्ट्रमत' आणि 'स्वतंत्र हिन्दुस्तान'चे संपादक, लेखक व नाटककार, त्यांची रणदुंदुंभी व राक्षसी महत्त्वाकांक्षा ही नाटके प्रसिद्ध आहेत.
१९०१: कृष्णाजी भास्कर तथा 'तात्यासाहेब' वीरकर – शब्दकोशकार, अनेक शैक्षणिक संस्थांचे संस्थापक.
१९०५: मालती बेडेकर ऊर्फ 'विभावरी शिरुरकर'–लेखिका (मृत्यू: – २००१)
१९१४: आझाद हिंद सेनेचे अधिकारी गुरुबख्श सिंह ढिल्लो यांचा जन्मदिन.
१९१९: इंद्रजित गुप्ता – केन्द्रीय गृहमंत्री आणि कम्युनिस्ट पक्षाचे नेते (मृत्यू: २० फेब्रुवारी २००१)
१९२१: एन. के. पी. साळवे – भारतीय राजकारणी, केंद्रीय मंत्री व बी. सी. सी. आय. चे अध्यक्ष (मृत्यू: १ एप्रिल २०१२)
१९३८: बलबीरराज पृथ्वीराज कपूर तथा 'शशी कपूर' – अभिनेता
१९४८: एकनाथ सोलकर – अष्टपैलू क्रिकेटपटू (मृत्यू: २६ जून २००५)
१९८९: भारतीय क्रिकेट खेळाडू श्रीवत्स गोस्वामी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७१: इंग्लिश गणितज्ज्ञ ऑगस्टस द मॉर्गन.
१९०८: सर जॉन इलियट – भारतातील हवामानशास्त्रविषयक कार्यामुळे प्रसिद्धी पावलेले ब्रिटिश हवामानशास्त्रज्ञ. १८८७ ते १८९३ या कालावधीत ते भारत सरकारच्या हवामान खात्याचे प्रमुख होते.
१९४७: जनरल मोटर्स आणि शेवरलेट कंपनी चे सहसंस्थापक विल्यम सी ड्युरंट यांचे निधन. (जन्म: ८ डिसेंबर १८६१)
१९५६: प्रसिद्ध मराठी विद्वान नारायण शास्त्री मराठे यांचे निधन.
२०००: हिंदी चित्रपट क्षेत्रांतील प्रसिद्ध गायिका राजकुमारी दुबे यांचे निधन.
२००३: ओस्बोर्न कॉम्पुटर कॉर्पोरेशन चे संस्थापक अ‍ॅडम ओस्बोर्न यांचे निधन. (जन्म: ६ मार्च १९३९).

# मायकोरायझा पिकांसाठी निसर्गाने दिलेले 'सुपरफ्रेंड'

शेतीमध्ये वाढता खर्च, रासायनिक खतांवर वाढलेले अवलंबन आणि जमिनीची घटती सुपीकता ही मोठी समस्या बनली आहे. अशा परिस्थितीत निसर्गाशी सुसंगत, खर्च कमी करणारे आणि उत्पादन वाढवणारे उपाय स्वीकारणे अत्यंत गरजेचे आहे. अशाच एका अदृश्य पण अत्यंत प्रभावी जैविक घटकाचे नाव आहे मायकोरायझा. ही बुरशी पिकांच्या मुळांशी सहजीवन निर्माण करून पिकांना नैसर्गिकरित्या बळकट बनवते.

मायकोरायझा म्हणजे काय? : मायकोरायझा ही एक जैविक, उपयुक्त बुरशी असून ती वनस्पतींच्या मुळांवर व मुळांमध्ये वाढते. ही बुरशी आणि वनस्पती यांच्यातील संबंधाला सहजीवी संबंध म्हणतात. या नात्यात दोघांनाही फायदा होतो.

एन्डो मायकोरायझा : ही बुरशी मुळांच्या आत शिरून स्फुरद, झिंक व पाणी मुळांपर्यंत पोहोचवते. त्यामुळे मुळे मजबूत होतात, झाडाची वाढ चांगली होते व उत्पादन वाढते. मिरची, टोमॅटो, हरभरा, सोयाबीन, कापूस, ऊस यांसारख्या सर्व शेती पिकांसाठी ही सर्वात उपयुक्त मायकोरायझा आहे.

एक्टो मायकोरायझा : ही बुरशी मुळांच्या बाहेर आवरण तयार करून पाणी व पोषण शोषण्यास मदत करते. प्रामुख्याने साग, निलगिरी, पाइन यांसारख्या जंगलातील झाडांसाठी उपयोगी असून सामान्य शेती पिकांत कमी वापरात आहे.

मायकोरायझा बुरशी जमिनीत आपले सूक्ष्म तंतू पसरवून पाणी, स्फुरद व सूक्ष्म अन्नद्रव्ये मुळांपर्यंत पोहोचवते. वनस्पती प्रकाशसंश्लेषण करून तयार केलेली शर्करा (अन्न) मायकोरायझाला देते.

याचा दोघांनाही फायदा होतो, त्यामुळे मुळे मजबूत होतात, झाडाची वाढ चांगली होते, उत्पादन वाढते हाच आहे सहजीवनाचा खरा अर्थ.



# 'या' आजारामुळे होऊ शकतो जनावरात अचानक गर्भपात!



जनावरातील गर्भपात हा गाभण कालावधीत वेगवेगळ्या कारणामुळे कोणत्याही वेळी होऊ शकतो. काही वेळा निरोगी गाभण जनावरामध्ये अचानक गर्भपात झाल्याचे दिसून येते. गर्भपाताची कोणतीही लक्षणे दिसत नाहीत तरी होणारा हा गर्भपात लेप्टोस्पायरोसिस या आजारामुळे होतो. गाभण जनावरांमध्ये चौथ्या महिन्याच्या पुढील आणि गर्भधारणेच्या शेवटच्या टप्प्यात असलेल्या जनावरांमध्ये गर्भपाताची समस्या दिसून येते.

आजाराचा प्रसार : लेप्टोस्पायरोसिस हा जीवाणूजन्य आजार असून १५० हून अधिक प्राण्यांच्या प्रजातीमध्ये हा रोग दिसून येतो. जास्त दूध देणाऱ्या जनावरांमध्ये लेप्टोस्पायरोसिस आजाराचा प्रादुर्भाव अधिक दिसून येतो. या रोगाचा प्रसार प्रामुख्याने गवत, पिण्याचे पाणी, चारा यावर आजारी जनावरांचे मूत्र, गर्भाशयाचा स्त्राव पडल्याने होत असतो. बाधित जनावरांचे मूत्र हे प्रसारास प्रमुख कारणीभूत घटक असते. एखाद्या जनावराला या रोगाची बाधा झाल्यास आजारपणानंतर जवळपास ४० दिवस या रोगाचे जंतु मुत्रा वाटे बाहेर पडत असतात. हा आजार सर्व पाळीव प्राणी, तसेच जनावरांपासून माणसांमध्येही याचा संसर्ग होत असतो. अति पावसाच्या, पाणथळ भागात जेथे पाणी साठून राहते तसेच ज्या ठिकाणी हवेत आर्द्रतेचे जास्त प्रमाण आहे अशा ठिकाणी लेप्टोस्पायरोसिस या आजाराचा प्रादुर्भाव दिसून येतो. या आजाराचे जीवाणू उंदराच्या शरीरात सुप्त अवस्थेत असतात. त्यांच्या मलमूत्राद्वारे झपाट्याने या आजाराचा प्रसार होत असतो. आजाराची लक्षणे : या आजाराचा प्रादुर्भाव तत्काळ तीव्र, तत्काळ सौम्य आणि दीर्घकालीन तीव्र या तीन टप्प्यात दिसून येतो. एक महिन्यापर्यंतची वासरे या रोगाला पटकन बळी पडतात. गाभण जनावरांमध्ये चौथ्या महिन्याच्या पुढील आणि गर्भधारणेच्या शेवटच्या टप्प्यात असलेल्या जनावरांमध्ये गर्भपाताची समस्या दिसून येते. कोणतीही लक्षणे नसताना अचानकपणे जनावरांचा गर्भपात होणे हे या आजाराचे मुख्य लक्षण आहे. या आजाराचे निदान जनावरांच्या लघवीमधील रोगजंतूचा प्रादुर्भाव तपासून करता येते.

प्रतिबंधात्मक उपाय : घूस, उंदीर यांची संख्या कमी करण्यासाठी गोठ्यात तसेच आजूबाजूच्या परिसरात स्वच्छता ठेवावी. शरीरावर जखम असल्यास त्वरित उपचार करावेत. लक्षणांनुसार प्रभावी प्रतिजैविके पशु वैद्यकांच्या सल्ल्याने द्यावीत.

# सिंचन साहित्याच्या दरात ४० टक्क्यांची वाढ

## बळीराजा आर्थिक संकटात, युद्धाचा परिणाम



पुणे : संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिलेल्या इराण आणि इस्त्रायल-अमेरिका यांच्यातील युद्ध दिवसागणिक अधिक तीव्र होताना दिसत आहे. आखाती देशांमधील युद्धाचा थेट परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होत असून, सर्वसामान्यांनाही त्याची झळ सोसावी लागत असल्याचे चित्र आहे. अशातच आता या युद्धाचा थेट परिणाम शेती क्षेत्रावरही पडू लागला आहे. कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने शेतीसाठी लागणाऱ्या विविध सिंचन साहित्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. कच्चे तेल रिफायनरी करताना त्यातून निघणाऱ्या घटकातून सिंचनचे पाईप निर्मिती होते. या कच्च्या मालाचा पुरवठा थांबल्याने तुषार सिंचन, ठिबक सिंचन संच, पीव्हीसी पाईप, मोटार पंप तसेच, मोटरपंप केबल यांच्या किमतीत तब्बल ३५ ते ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

उन्हाळी हंगामासाठी सिंचनाची तयारी करत असताना अचानक वाढलेल्या दरांमुळे शेतकऱ्यांनाचे नियोजन विस्कळीत झाले आहे. शेतकऱ्यांना हे साहित्य घेताना आता अतिरिक्त १५ ते २० हजार रुपये मोजावे लागत आहेत. युद्धापूर्वी तृषार सिंचन सेट ३२ हजार ७०० होता. तोच दर आता ४४ हजार इतका झाला आहे. म्हणजेच त्यात २५ टक्के वाढ झाली आहे. ठिबक सिंचन एकरी ४० हजार खर्च, आता ६० हजार झाला आहे, म्हणजे यात ३० टक्के वाढ झाली आहे. पीव्हीसी पाईप ७५ एमएम ४६० किमतीत होता तो आता ६२० रुपये झाला आहे. पीव्हीसी पाईप ९० एमएम ५४०, आता ८६० रुपये- ४० टक्के वाढ तर मोटार पंप केबल पुर्वी ९० रुपये मीटर, आता १६५ रुपये मीटर झाले असून यात ८५ टक्के वाढ झाल्याचे दिसत आहे. ५ एचपी मोटार पंप २२५००, आता २४ हजार ५०० तर ७.५० एचपी मोटार पंप ३१ हजार होता, तो आता ३४ हजार २०० झाला असून, यात १५ टक्के वाढ झाली आहे.

# "डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला राज्यस्तरीय दोन मानाचे पुरस्कार"

अकोला / प्रतिनिधी

समाजसेवा, आपत्ती व्यवस्थापन आणि राष्ट्रीय कर्तव्य यांचा संगम असलेल्या राज्यस्तरीय 'आव्हाण (चॅन्सलर्स ब्रिगेड) २०२५२६' या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे करण्यात आले. या राज्यस्तरीय 'आव्हान'चे उद्घाटन दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या हस्ते झाले.

१७ ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत चाललेल्या या शिबिरामध्ये स्वयंसेवकांना केवळ प्रशिक्षण देण्यात आले नाही, तर संकटाच्या क्षणी पुढे उभे राहण्याची मानसिकता घडवण्यात आली. सकाळच्या सत्रात योगा, शारीरिक व्यायाम, धावणे यांसारखे कठोर प्रशिक्षण



देण्यात आले,तर दुपारच्या सत्रात स्वयंसेवकांना नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींचा सामना कसा करावा, याचे सखोल बौद्धिक व प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. हे संपूर्ण प्रशिक्षण एन.डी.आर.एफ.च्या अनुभवी जवानांनी प्रत्यक्ष हाताळले. तलावातील रेस्क्यू ऑपरेशन, हृदयविकाराच्या झटक्यात द्वारे जीव वाचवण्याचे तंत्र, आग लागल्यावर तात्काळ बचाव कार्य, घरगुती गॅस सिलेंडर दुर्घटना तसेच उंच इमारतींमध्ये आग लागल्यास सुरक्षित बचाव कसा करावा, ही सर्व प्रात्यक्षिके स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष अनुभवली. या राज्यस्तरीय 'आव्हान' मध्ये राज्यातील २४ विद्यापीठांतील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमात विविध कामगिरीसाठी एकूण ९ पारितोषिक होते ज्यापैकी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील, कृषी महाविद्यालय अकोला येथील विद्यार्थ्यांनी आपल्या कामगिरीने विशेष ठसा उमटवत उत्कृष्ट स्वयंसेवकाची दोन मानाची पारितोषिके मिळवली. मुलांमधून अथर्व ताठे व मुलींमधून प्रणाली टाले यांनी उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून निवड होत ही पारितोषिके माननीय कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या हस्ते स्वीकारली. ही कामगिरी केवळ वैयक्तिक यश नसून, विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यपद्धतीची पावती आहे. या उल्लेखनीय यशामागे ग्रुप लीडर व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. अनिल एच. खाडे यांचे काटेकोर नियोजन, सातत्यपूर्ण मार्गदर्शन व विशेष सहकार्य लाभले. तसेच सहयोगी अधिष्ठाता(कृ.म.अकोला) डॉ. संजय भोयार यांची प्रेरणा व दिशादर्शक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले. याशिवाय विद्यार्थी कल्याण अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यापीठ समन्वयक डॉ. संदीप हाडोळे यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना या राज्यस्तरीय आव्हानात सहभागी होण्याची संधी मिळाली. डॉ. देशमुख मॅडम, डॉ. तांबे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन तसेच शारीरिक तंदुरुस्तीची जबाबदारी यशस्वीरीत्या सांभाळणारे धीरज जैन यांचे योगदानही विशेष उल्लेखनीय ठरले.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
बुधवार दि.१८ मार्च २०२६ ५



# धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर लोहमार्गाने बीड जिल्हा उत्तर भारत-दक्षीण भारताशी जोडला जाणार

## खा. डॉ. भागवत कराड यांची स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समितीला माहिती

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्वात जुना अहिल्यानगर- बीड- परळी वैद्यनाथ लोहमार्ग आहे. याचे कामे अिलकडच्या काळामध्ये जलद गतीने होत आहे. बीड जिल्ह्याला यासह धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर या नवीन लोहमार्गाने जोडले जाणार आहे. यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. धाराशिव - छत्रपती संभाजनीगर लोहमार्गाने बीड जिल्हा उत्तर भारत आणि दक्षीण भारताशी जोडला जाऊन बीड जिल्ह्याचे ठिकाण लोहमार्गाचे जंक्शन होईल अशा दृष्टीने बीड जिल्ह्याचा विकास होणार असल्याची माहिती खा.डॉ.भागवत कराड यांनी दिली. खा. डॉ. भागवत कराड हे रविवारी (दि.१५) बीड मार्गे छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर होते. रात्री उशीरा त्यांनी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समिती, बीड च्या शिष्टमंडळास बीड येथील हॉटेल सनराईज येथे भेटण्याची वेळ दिली. यावेळी समितीच्या शिष्टमंडळास चर्चा करताना डॉ. खा. कराड यांनी माहिती दिली.



यावेळी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा, सचिव सुनील क्षीरसागर, ज्येष्ठ मार्गदर्शक सत्यनाराण लाहोटी, सुरेश मेखे, भास्करराव जाधव, अशोक शेटे, शांतीलाल पटेल, वाय. जनार्दन राव, विष्णुदास बियाणी, शिवाजी जाधव, मनमोहन कलंत्री, विलासराव बडगे, अरुण डाके, सुरेश बुध्ददेव, डॉ. अरुण भस्मे, अप्पासाहेब शिंदे, राजेंद्र बंब, प्रा. मन्मथ हेरकर, महंमद लईक, रामचंद्र जोशी, तुकाराम सोळंके, रवी उबाळे, हमीद देशमुख, वैभव स्वामी, गोविंद कासट, भाऊसाहेब चंदनशीव, मंगेश लोळगे, सय्यद नवीदुजम्मा, सोमनाथ खताळ आदी उपस्थित होते.

डॉ. खा. कराड, म्हणाले, धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर बीड मार्गे जोडल्या जाणाऱ्या लोहमागार्साठी मी व्यक्तीहा राज्यसभेमध्ये मागणी मांडली आहे.

या लोहमार्गाचा अनेक जिल्ह्यांना आणि विषेशत: बीड जिल्ह्यामार्गे उत्तर भारत आणि दक्षीण भारत जोडून मराठवाड्याच्या विकासाचे नवे दालने खुले होईल, असे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्याचबरोबर रेल्वे मंत्री यांनी देखील तत्वता: संमती दिलेली आहे, अशी माहिती खा.डॉ. कराड यांनी बीड येथे चर्चा करताना दिली. दक्षीण भारत - उत्तर भारतास जोडला जाणार : धाराशिव- संभाजीनगर या नवीन रेल्वे मार्गासाठी ७ ते ८ कोटी ठेवले आहेत. सर्व्हे करुन घेणार, त्याचा डिपीआर तयार होईल त्यास देखील पाठपुठपुरावा करुन मंजुरी करुन घेतली जाईल, तीच रेल्वे पुढे कन्नडमार्गे धुळ्यास जोडणार म्हणजे दक्षीण भारत - उत्तर भारतास जोडला जाणार आहे, असेही खा. डॉ. भागवत कराड यांनी सांगितले.

सोलापूर- धुळे लोहमार्ग बीडच्यापुढे असा असेल : बीड, गेवराई, पैठण, बीडकिन, शेंद्रा-छत्रपती संभाजीनगर, दौलताबाद - वेरुळ, कन्नड, चाळीसगाव नंतर धुळे असा हा लोहमार्ग असणार आहे.

दुसरा नवीन लोहमार्ग असेल : छत्रपती संभाजीनगर - गंगापूर- शनीशिंगनापर- अहिल्यानगर- पुणे असा नवीन लोहमार्ग असणार आहे. त्यामुळे लोहमार्गचे जाळे छत्रपती संभाजीनगरच्या भोवती विकासासाठी जोडले जाणार असल्याचेही खा.डॉ. कराड यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगर, नंदेड डिव्हीजन ठेवा : येणाऱ्या काळामध्ये मराठवाडा विविध लोमार्गाने जोडला जाणार आहे. त्यामुळे आठही जिल्ह्यांमध्ये याच्या विस्तारीकरणाचे फायदे होईल. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड हे दोन्ही जंक्शन चे ठिकाणे होतील. ते दोन्ही लोहमार्गासाठी स्वतंत्र डिव्हीजन म्हणून डिव्हीजन राहिले पाहिजे यासाठी आमचा प्रयत्न असणार आहे, असेही खा.डॉ. कराड यांनी सांगितले.

बीड शहर ठिकाण जंक्शन होईल : बीड हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. अहिल्यानगर- बीड - परळी वैद्यनाथ असा पश्चीम-पुर्व लोहमार्ग असणार आहे आणि दुसरा लोहमार्ग धाराशिव- बीड- छत्रपती संभाजीनगर असा असणार आहे. त्यामुळे बीड शहर जिल्ह्याचे ठिकाण मध्यवर्ती असल्याने या ठिकाणी जंक्शन होईल, असेही खा.डॉ. कराड यांनी सांगितले.

# सिलिंडरसाठी ५ दिवसांचे वेटिंग, ३८ अंश तापमानातही ग्राहक रांगेत

## ग्राहक आणि एजन्सी कर्मचाऱ्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची, संयम बाळगण्याचे आवाहन

जालना । प्रतिनिधी

अमेरिका-इस्रायल व इराण युद्धाचा मोठा फटका घरगुती स्वयंपाक व व्यावसायिक गॅसधारकांना बसला आहे. युद्ध संपण्याची कोणतीही चिन्हे दिसत नसल्यामुळे जालन्यात नागरिक मोबाइलद्वारे बुकिंग करून सिलिंडर मिळवण्यासाठी एजन्सीसमोर लांबच-लांब रांगा लावत आहेत. सोमवारी दुपारी ३८ अंश तापमानातही ठिकठिकाणच्या एजन्सीबाहेर नागरिक पैसे भरून पावती घेण्यासाठी उभे होते. एजन्सीधारकांकडून ४ ते ५ दिवसांपूर्वी बुकिंग केलेल्या ग्राहकांनाच प्राधान्याने सिलिंडरचा पुरवठा केला जात होता. यावरून ग्राहक व कर्मचाऱ्यांमध्ये बाचाबाची होत असल्याचेही दिसून आले. अवघ्या दोन दिवसांवर गुढीपाडवा आहे. चार दिवसांनी ईद आहे. त्यामुळे गॅस घेऊन जाण्यासाठी एजन्सी, गोदामावर गर्दी होत आहे. मामाचौकात गॅस सिलिंडरची पावती घेण्यासाठी एजन्सीबाहेर रांग लागली.



होम डिलिव्हरी बंद, गोदामातून पुरवठा बुकिंग केल्यानंतर घरपोच सिलिंडर मिळत असताना ही सेवा बंद झाल्यामुळे ग्राहकांना थेट एजन्सी गाठावी लागत आहे. याठिकाणी आल्यावर पैसे देऊन पावती घेण्यासाठी भर उन्हात प्रतीक्षा करावी लागत आहे. दरम्यान, रखरखत्या उन्हामुळे अंगाची लाही होत असतानाही गॅस घेऊन जायचाच असा निश्चय करून अनेकजण उभे होते.

सिलिंडरचे वितरण सुरळीत घरगुती गॅसची टंचाई नाही. नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवता संयम बाळगावा. कुणी काळ्या बाजारात गॅसची विक्री करत असल्यास त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल. - सविता चौधर, जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना. युद्ध लांबण्याची धास्ती, सण-उत्सवातही गरज गुरुवारी गुढीपाडवा आहे. शनिवारी रमजान ईद आहे. हिंदू-मुस्लिमसह सर्व समाजबांधव हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. या दिवशी विविध खाद्यपदार्थ तयार केले जातात. त्यामुळे सण-उत्सवात स्वयंपाकाची अडचण होऊ नये म्हणून गॅस घेऊन जाण्यासाठी ग्राहक गर्दी करत आहेत. युद्ध लांबतच चालल्यामुळे गॅस मिळेल की नाही याची धास्ती वाटत आहे. त्यामुळे अनेकजण घरात एक सिलिंडर असतानाही दुसरा भरून नेत आहेत. २२ किमीवरून आलो चार दिवसांपासून गॅस संपला आहे. चुलीवर स्वयंपाक बनवला जात आहे. शनिवारी बुकिंग केले होते. मात्र घरपोच सिलिंडर देणाऱ्या गाड्या येणे बंद झाले. त्यामुळे सिलिंडरसाठी यावे लागले.

# वक्तृत्व कौशल्यामुळे योग्य-अयोग्य ठरवण्याची क्षमता निर्माण होते- डॉ. मोरे

## राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत आकाश मोहिते प्रथम

अहिल्यानगर । प्रतिनिधी

भाषा हे ज्ञान निर्मितीचे प्रमुख साधन आहे. ज्याला भाषेचा प्रभावी वापर करता येतो तो व्यक्ती विविध क्षेत्रांत यशस्वी होतो असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी केले. न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे कै. ह. कृ. तथा बाळासाहेब काळे स्मृतिकरंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, विश्वासराव काळे, उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, डॉ. अनिल आठरे, प्रा. पोपटराव काळे, अशोकराव काळे आदी उपस्थित होते.

भगवान श्रीकृष्णाने आपल्या वक्तृत्वाच्या सामर्थ्यावर अर्जुनाची बाजू अत्यंत चातुर्याने कशी मांडली हे सांगून वक्तृत्वाच्या कौशल्यामुळे योग्य-अयोग्य ठरवण्याची ताकद निर्माण होते, असेही त्यांनी स्पष्ट केले. राजकारण, समाजकारण व सार्वजनिक जीवनात वक्तृत्वाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने बोलण्याचा सल्ला दिला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी मनोगत व्यक्त करताना कै. ह. कृ. तथा बाळासाहेब काळे यांनी सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाची विस्तृत ओळख करून दिली. संस्थेच्या सदस्या अरुणा काळे यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. तर प्रा. मेधाताई काळे यांनी कै. ह. कृ. तथा बाळासाहेब काळे यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय डॉ. वैशाली भालसिंग यांनी करुन दिला. सूत्रसंचालन डॉ. अशोक गायकवाड यांनी तर आभार प्रा. राजेंद्र साबळे यांनी मानले. वक्तृत्व स्पर्धेसाठी 'जग तिसऱ्या महायुध्दाच्या छायेत', 'कृत्रिम बुध्दिमत्तेची शेती क्षेत्रातील भरारी', 'रिल्स संस्कृती' असे विषय होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. शांतिलाल घेगडे व प्रा. रामदास कातकडे यांनी काम पाहिले. महाराष्ट्रातील विविध भागातून स्पर्धक सहभागी झाले होते.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. मीना साळे, प्रा. निलेश लंगोटे, प्रा. निखिल गोयल, प्रा. अनिकेत डमाळे, प्रा. भागवत ठाकूर, प्रा. मयूर रोहोकले, प्रा. विजया कोळेकर, प्रा. किशोर ताके व प्रा. सुवर्णा कदम आदींनी परिश्रम घेतले. वक्तृत्व स्पर्धेत आकाश मोहितेला प्रथम क्रमांक या वर्षीचा ह. कृ. तथा बाळासाहेब काळे करंडक न्यू आर्ट्स कॉलेज, पारनेरचा विद्यार्थी आकाश मोहिते याने पटकाविला, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक सी. टी. बोरा महाविद्यालय, शिरूर येथील विलास दसगुडे, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पी. एन. पी. महाविद्यालय, अलिबाग येथील पंकज पांडुळे तर उत्तेजनार्थ पारितोषिक निखिल बोडखे यांनी मिळविले.

# लाचखोर पीआय, अंमलदाराची न्यायालयीन कोठडीत रवानगी

जालना । प्रतिनिधी

वाळू वाहतूकदारावर कारवाई न करण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच घेताना मंठा ठाण्यातील पोलिस निरीक्षक मनोजकुमार राठोड व अंमलदार रवी जाधव हे लाचेच्या जाळ्यात अडकले आहेत. दरम्यान, त्यांची पोलिस कोठडी संपल्यानंतर त्यांना सोमवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते. या दोघांचीही न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे, अशी माहिती तपास अधिकारी एसीबीचे उपअधीक्षक बाळू जाधव यांनी दिली.

हे दोघेही लाचखोर तीन दिवस पोलिस कोठडीत होते. जाधव याला रंगेहाथ लाच घेताना पकडण्यात आले आहे. राठोड यांनी या रकमेसाठी प्रतिसाद दिला आहे. ठाण्यातच ही रक्कम स्वीकारल्याने या कारवाईची चांगलीच चर्चा झाली आहे. या कारवाईमुळे जालना पोलिस दलाची प्रतिमा मलिन झाली आहे. दरम्यान, पीआय मनोज कुमार राठोड यांची ठाण्यातील कामकाज नेहमीच संशयास्पद राहिलेले आहे. काही महिन्यांपूर्वी ठाण्यातील एक वाहन विक्री करण्यात आल्याच्या प्रकरणामुळेही ठाण्यातील कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले होते. दरम्यान, त्यांचे वेतन व जमविलेली मालमत्ता यादृष्टीनेही अहवाल तयार केला जात आहे. वेबसाइटवर अजूनही राठोड यांचाच फोटो मनोजकुमार राठोड हे लाचेच्या जाळ्यात अडकल्याने त्या ठाण्यात पोलिस निरीक्षक देण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

# कुरब्यात गुन्हेगार सोनवणेच्या शोधासाठी पथके रवाना

## पोलिस पोहोचले असताना एक आरोपी होता घरातच

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

नारेगावातील विवाहितेचा बळजबरीने गर्भपात करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यात माहेरच्या मंडळींनी पोलिसांना फोन केल्यावर पथक तत्काळ त्या ठिकाणी पोहोचले. तोपर्यंत सर्व आरोपी पळून गेले असल्याचा दावा करण्यात येत आहे.

मात्र सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कमल तीनगोटे ही त्याच घरात लपून होती. सर्व पथक माघारी गेल्यावर ती मागच्या दाराने पळून गेली. तिचा अद्यापही पोलिस शोध घेत आहेत. दरम्यान, यात शनिवारी अटक केलेला आरोपी शंकर आढावे याला न्यायालयाने १८ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली असल्याची माहिती तपास अधिकारी एपीआय कैलास लहाने यांनी दिली. यापूर्वी या प्रकरणात एमआयडीसी सिडको पोलिसांनी पती अरबाज सय्यद, सासू आसिया आणि सासरा फेरोज सय्यद या तिघांना बेड्या ठोकल्या आहेत. यातील मनपाचा कंत्राटी कर्मचारी शंकरवर संशयाची सुई होती. पोलिस पथकाची कसलीही भीती न बाळगता तो दुसऱ्या दिवशी कामावर हजर झाला. मनपाच्या आरोग्य विभागाने संपूर्ण प्रकरणाची चौकशी केल्यावर त्यांनाही या कटात शंकरचा सहभाग असल्याचे दिसून आले होते. त्या कर्मचाऱ्यांनी पोलिसांशी संपर्क करून तो कामावर हजर झाल्याची माहिती दिल्यावर पथकाने त्यास बेड्या ठोकल्या तर कुख्यात आरोपी सतीश सोनवणेचा शोध सुरू आहे. संबंधित गुन्ह्याचे स्वरूप पाहता हे कृत्य टोळीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने केल्याचे स्पष्ट होते. संघटित गुन्हेगारीचे कंबरडे मोडण्यासाठी केवळ सामान्य कलमे पुरेशी नाहीत.

# सात बैलगाड्या ओढत शंकर काळमेघ 'गाळबगाळ' परंपरा कायम राखणार

## दहिगाव रेचा येथे २० मार्चला सोहळा, गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी आयोजन

अंजनगाव । प्रतिनिधी

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील दहिगाव रेचा येथील प्राचीन व जागृत आई जगदंबा देवी मंदिरात नवरात्रोत्सव व यात्रा महोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. फाल्गुनचैत्र शुक्ल पक्षात होणाऱ्या या उत्सवात गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी २० मार्चला पारंपरिक 'गाळबगाळ' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या अनोख्या परंपरेकडे पंचक्रोशीतील भाविकांचे लक्ष लागले आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे जगदंबा देवी संस्थानचे पुजारी ह.भ.प. भानुदास महाराज काळमेघ यांचे सुपुत्र ह.भ.प. शंकर काळमेघ यांचा अद्वितीय पराक्रम. दरवर्षीप्रमाणे यंदाही शंकर काळमेघ हे लोकांनी भरलेल्या सात बैलगाड्या एकाच वेळी ओढत गाळबगाळ परंपरा साकार करणार आहेत.

शारीरिक ताकद, श्रद्धा आणि ग्रामीण परंपरेचा संगम असलेला हा थरारक सोहळा पाहण्यासाठी तालुक्यासह आसपासच्या गावांतून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहतात. गाळबगाळ ही बैलगाड्या ओढण्याची दुर्मिळ



व वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण परंपरा मानली जाते. या परंपरेचे जतन करण्यात शंकर काळमेघ यांचे योगदान विशेष मानले जाते. अनेक वर्षांपासून सात बैलबंड्या ओढण्याची जबाबदारी ते श्रद्धेने पार पाडत असून, त्यांच्या या पराक्रमामुळे पंचक्रोशीत त्यांचे नाव विशेष आदराने घेतले जाते. गाळबगाळ सोहळ्याची मिरवणूक विलास भगत यांच्या घरापासून प्रारंभ होऊन चावडी चौक, गाईचे गौठान मार्गे देवीच्या मंदिरापर्यंत काढण्यात येणार आहे. या मार्गावर भाविकांची मोठी गर्दी होत असून भक्तिगीत, जयघोष आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात वातावरण भक्तिमय बनते. यात्रा महोत्सवाची सांगता गुढीपाडव्याच्या तिसऱ्या दिवशी २१ मार्च रोजी होणार आहे. त्या दिवशी सकाळी गावातून आई जगदंबा देवीची पालखी प्रदक्षिणा काढण्यात येईल. त्यानंतर शंकर रेचे यांच्या घरातून राधाकृष्णांची भव्य मिरवणूक निघेल. ही मिरवणूक भुषण रेचे यांच्या घरी भोजनानंतर देवीच्या मंदिरात पोहोचणार आहे. मंदिरात पारंपरिक नवनिर्माण ढोलाच्या गजरात धार्मिक कार्यक्रम पार पडतील. यामध्ये ह.भ.प. साहेबराव भगत, ह.भ.प. अनंतराव मानकर व त्यांच्या साथ-संगत मंडळाकडून काल्याचे कीर्तन सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर दहीहंडी उत्सव व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गावकरी, जगदंबा देवी उत्सव समिती तसेच छत्रपती ग्रुप, दहिगाव रेचा यांचे सहकार्य लाभत आहे, अशी माहिती आयोजकांच्या वतीने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. भाविकांची राहणार मोठी उपस्थिती या यात्रा महोत्सवासाठी जगदंबा देवी उत्सव समितीकडून व्यापक तयारी करण्यात येत असून गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत आहे. विशेषतः शंकर काळमेघ यांच्या गाळबगाळ पराक्रमाचा सोहळा पाहण्यासाठी दरवर्षी भाविक उपस्थित राहतात. यंदाही पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या परंपरेचा आनंद घ्यावा, असे आवाहन उत्सव समितीने केले आहे.

# भगवंताचे नामस्मरण, भजन आणि सेवा हीच खरी साधना- राऊत

## हभप रामेश्वर महाराज राऊत यांनी उपस्थित भाविकांना केले मार्गदर्शन

सोनई । प्रतिनिधी

भगवंताच्या नामस्मरणाने मानवी देह पवित्र होतो. जीवनातील साध्य गाठायचे असेल तर त्यासाठी योग्य साधनांची निवड करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन हभप रामेश्वर महाराज राऊत यांनी केले. वद्य एकादशीनिमित्त सद्गुरु नारायणगिरी महाराज आश्रम, नेवासा बुद्रुक येथे आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन महोत्सवात ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता ब्रह्मलीन सद्गुरु नारायणगिरी महाराज तसेच सकल देवतांची पूजा व आरतीने करण्यात आली. सकाळी १० वाजता हभप रामेश्वर महाराज राऊत यांची कीर्तनरूपी सेवा पार पडली.

पवित्र तो देह सदा ज्याचा नेम, वाचे गाये राम सर्वभावे या अभंगावर त्यांनी प्रभावी निरूपण केले. माणसाचे अंतिम साध्य सुख आहे. मात्र माणूस प्रपंचरूपी साधना निवडतो, जी अनेकदा दुःखाचे मूळ ठरते. त्यामुळे खऱ्या सुखासाठी भजन, नामस्मरण आणि सेवा हीच खरी साधना आहे. कलियुगात कीर्तन व भजन ही साधना सर्वात सोपी आणि प्रभावी असल्याचे त्यांनी सांगितले.

परमार्थ करताना अहंकार नसावा, भक्ताच्या जीवनात मोह-ममता नसावी आणि मनुष्याने काम, क्रोध व लोभ या तीन विकारांचा त्याग करावा, असेही त्यांनी मार्गदर्शन केले. संतांना समाजाकडून अनेकदा अवहेलना आणि त्रास सहन करावा लागला. तरीही साधूचा स्वभाव हा समाजाचा त्रास सहन करण्याचा असतो. आपल्याकडून कुणाचे चांगले होत नसेल तरी हरकत नाही; पण आपल्या कृतीमुळे कोणाचे नुकसान होऊ नये. आपल्या प्रमाणे दुसऱ्याला पाहणे हा सर्वोच्च परमार्थ आहे, असे त्यांनी सांगितले. कीर्तनानंतर विविध प्रकारची सेवा देणाऱ्या दात्यांचा राऊत महाराजांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

cmyk

# राज्य लोकतंत्र ५ वर्धापनदिन विशेषांक-२०२६



दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन व रमजान ईद च्या तमाम नागरीकांना
हार्दिक शुभेच्छा..!
:::शुभेच्छुक:::
इस्लाम भैय्या चाऊस

राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
-----: शुभेच्छुक :-----
अशोक रसाळ
अध्यक्ष भाजपा बालाघाट

राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
रमजान ईदच्या तमाम जनतेस
हार्दिक शुभेच्छा...
नगरसेवक
राहुल खंडागळे
राजा पठाण शेख साजेद सागर राऊत अतीक सरपंच

राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
C I T U
* शुभेच्छुक *
कॉ.ओम पुरी
राज्य सचिव-लाल बावटा
बांधकाम कामगार संघटना सिटु

राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
आमच्या शाळेची शान राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक शशिकांत कुलथे सर
राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार
NATIONAL AWARDS TO TEACHERS
5 सितम्बर, 2022
5 September, 2022
* शुभेच्छुक *
सरपंच, सर्व सदस्य, ग्रामपंचायत कार्यालय,
तथा अध्यक्ष व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव

दै.राज्य लोकतंत्रच्या वर्धापन दिनानिमित्त सर्व वाचक,जाहिरात दार यांना हार्दिक शुभेच्छा!

चाळक असोसिएट्स
कन्सल्टंट इंजिनियर्स कॉन्ट्रॅक्टर्स
दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा..!
- नगरपरिषद हद्दीतील व हद्दीबाहेरी जागेची गुंठेवारी व बांधकाम परवाना (ऑनलाइन व ऑफलाइन)
- घराचा प्लॅन, इस्टिमेट, व्हॅल्युएशन , ले-आउट
- रो-हाऊस, ई-टेंडरिंग, स्टील डिझायनिंग
- ईलिवेशन (3D), इंटेरियल डिझाईनिंग
- विहीर व पाईप लाईन इस्टिमेट
- प्लॉटिंग व जमिनीची खरेदी विक्री
- संपूर्ण बांधकाम मटेरियल सहित

9552059794
9422592589

सचिन अशोकराव चाळक (B. E .CIVIL)
9689800848
Email: chalakassociates gmail.com
अशोक रामराव चाळक (D.C.E)
कसल्टिंग सिव्हिल इंजिनिअर
न .प .नोंदणी. क्र:-G.M.C.W.S.2276/11
कार्यालय: काकडे कॉम्प्लेक्स समोर,मा .आ.लक्ष्मण(आण्णा)पवार यांच्या कार्यालयाच्या उत्तर बाजूस ,कोल्हेर ,रोड गेवराई

छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय
तथा वंदना प्रतिष्ठान पिंपरखेड
तालुका वडवणी जिल्हा बीड यांच्याकडून
राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
प्रकाश तुळशीराम खळगे सर
अध्यक्ष/सचिव

आपली माणसं आपला विकास
तुळजाभवानी अर्बन
मल्टीस्टेट को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि.माजलगाव
राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
मिळवा प्रति तोळा सर्वाधिक रक्कम!
तुळजाभवानी GOLD LOAN
- तात्काळ कर्ज मंजुरी
- कमीत कमी कागदपत्रांची गरज
- कर्ज रकमेएवढा विमा संरक्षण

माणसं आपली असली की आयुष्य आणि आर्थिक व्यवहार, दोन्ही सोपं होतं. तुळजाभवानी अर्बन
माजलगाव • पाथरी • सिरसाळा • परभणी • छत्रपती संभाजीनगर • नांदेड सेलू • बोरी • सोनपेठ • आळंदी • जवळा बाजार कुंभारी पिंपळगाव • अंबेजोगाई • कमलनगर • वसमत मानवत • आष्टी • मंठा • तीर्थपुरी • छ. शिवाजी महाराज चौक, माजलगाव
अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेला भेट द्या • 777 002 2222 • www.tujlabhavaniurban.com

राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
सोनं ठेवा सुरक्षित
कर्ज मिळवा त्वरित
गोल्ड लोन
आता प्रतीतोळा मिळवा
1 लाख
आम्ही करतो....
तुमच्या सोन्याची खरी किंमत!
- सोप्पी व सहज प्रक्रिया
- कमीत कमी व्याजदर
- तात्काळ मंजुरी

वर्धापन दिनानिमित हार्दिक शुभेच्छा...!
::: शुभेच्छुक :::
आर.जी. कानडे — संस्थापक अध्यक्ष
ॲड. रविंद्र कानडे — व्यवस्थापकीय संचालक
सर्व सन्माननीय संचालक मंडळ व कर्मचारी वृंद
मुख्य कार्यालय :
जुना मोंढा, माजलगाव जि. बीड
श्री मंगलनाथ मल्टीस्टेट
Web: shrimangalnath.com | 7507949494 • 7720061987 | Email : mangalnathho@gmail.com

राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
प्रा.सुशिलाताई मोराळे
सामाजिक कार्यकर्त्या

राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
विनोद मुळूक
उपनगराध्यक्ष
नगर परिषद, बीड

राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...
सुंदरराव मदनराव चव्हाण
भाजपा उपजिल्हाध्यक्ष-गेवराई विधानसभा
सौ.मयुरी सुंदरराव चव्हाण
सरपंच-नाथापूर ग्रामपंचायत

राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...
---: शुभेच्छुक :---
केशव आंधळे
सरपंच-पिंपळा ता.वडवणी जि.बीड

राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
प्रा.पंडित शेंडगे सर
श्री.अतुल लांगोरे सर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# बारामती पोटनिवडणूक लढवतो आणि जिंकून दाखवतो, लक्ष्मण हाकेंचा निर्धार, म्हणाले, सुनेत्रा पवारांना विधानपरिषदेवर घ्या

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. दोन्ही ठिकाणच्या सदस्यांचे अकाली निधन झाल्याने येथे निवडणूक जाहीर झाली असून २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. यापूर्वी राजकीय वातावरण तापल्याचं पाहायला मिळत आहे. .बारामती मतदारसंघात ओबीसी नेते लक्ष्मण हाके (ङ्गुारप क्राज्ञश ) यांनी थेट पवार कुटुंबीयांवर टीका करत येथील निवडणूक बिनविरोध करण्यास विरोध दर्शवला आहे. सुनेत्रा पवार (डींपर्शीीर झुरुी) यांना विधान परिषदेवर घ्यावं असं वक्तव्य लक्ष्मण हाके यांनी केलं आहे. आम्ही ही निवडणूक लढवतो आणि जिंकून दाखवतो असे हाके यानी म्हटलं आहे.



सुनेत्रा पवार यांना विधान परिषदेवर घ्यावं, इथं पवार सोडून विधानसभाला उमेदवार द्यावा असे मत लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केले आहे. आम्ही निवडणूक लढवतो पण काही जणांच्या पोटात दुखते. सुनेत्रा पवारांना विधान परिषदेवर पाठवा, आम्ही ही निवडणूक लढवतो आणि जिंकून दाखवतो असे हाके यांनी म्हटलं आहे. सुनेत्रा पवार यांना बिनविरोध विधानपरिषदेवर पाठवा. इथं अजित पवार यांच्या घरातील सोडून दुसरा उमेदवार उभा करा असेही हाके म्हणाले. राज्य शासनाच्या अनेक धोरणांच्या विरोधात आम्ही या निवडणुकीला सामोरं जात आहोत. शरद पवार यांना राज्यसभेवर बिनविरोध पाठवलं आहेच. मग सुनेत्रा पवार यांना देखील विधानपरिषदेवर बिनविरोध पाठवा असेही हाके म्हणाले. मी उमेदवार असेन असं नाही, येथील लोकलचा उमेदवार देखील निवडणूक लढवू शकतो असे हाके म्हणाले. २८ जानेवारीला विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर होणारी बारामतीची निवडणूक बिनविरोध होणार असल्याची चर्चा सुरु असतानाच आता ट्विस्ट पाहायला मिळत आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी निवडणूक लढवण्याची तयारी सुरु केल्याचं दिसत आहे. आपण निवडणूक लढवावी यासाठी बारामतीतील कार्यकर्त्यांकडून मोठा आग्रह असल्याचं ते म्हणाले. तसेच दादांच्या निधनानंतर तिसऱ्या दिवशी शपथविधी होतो, मग आम्हीच त्यांच्या निधनाचं दुःख का व्यक्त करायचं, असंही लक्ष्मण हाके यांनी म्हटलं होतं.

# माझ्याकडे मोठी माहिती, विमान दुर्घटनेवरुन रोहित पवारांचा गौप्यस्फोट; राष्ट्रवादीच्या आमदारांवरही जोरदार हल्लाबोल

**पुणे । प्रतिनिधी**



अधिवेशनात अजित पवार यांच्या विमान आपघातची चर्चा व्हावी, यासाठी अनेक दिवसापासून आम्ही सगळेच प्रयत्न करत आहोत. परंतू अजूनही या मुद्यावर चर्चा करू दिली जात नाही असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले. मी आत्ता विधानसभा अध्यक्ष यांची भेट घेतली आहे. उद्या किंवा सोमवारी या मुद्यावर चर्चा घेतली जाईल, असं ते म्हणाले आहेत, वाट बघूयात असे रोहित पवार म्हणाले.


शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी हे सुद्धा अजित पवार यांच्या विमान अपघाता संदर्भात चर्चा व्हावी, यासाठी प्रयत्न करत आहेत. पण चर्चा होऊ द्यायची नाही अस दिसत आहे.

व्हिएसआरला वाचवलं जात आहे, याच्या मागे कोणीतरी मोठा माणूस असल्याचे मत रोहित पवार यांनी व्यक्त केले. मोठी माहिती माझ्याकडे आहे. अगदी काही माहिती आम्ही आत्ता समोर आणली आहे. सरकार काय पाऊल उचलते हे बघू नाहीतर ती मोठी माहिती समोर आणू असेही रोहित पवार यावेळी म्हणाले. अजित पवार यांच्या सोबत सत्तेत असणारे किती स्मरण पत्र देणार, सत्तेत असून तुम्ही आपल्या माणसाला न्याय देऊ शकत नाही तुम्ही इतरांना काय न्याय देणार? असा सवाल रोहित पवारांनी केला. सुरवातीपासून मी सांगितलं होत, यात काही मी चुकीचा केलं नाही. एऊने मला दोन वेळेस बोलवलं होत. यंत्रणाना सुद्धा दबाव होता. पण आम्ही पक्षासोबत आणि विचारसोबत राहिलो आणि न्यायालयाचे धन्यवाद मानतो. यामध्ये आम्ही काही चुकीचा केलं नव्हतं म्हणून क्लीन चिट दिल्याचे रोहित पवार म्हणाले.

# दहावीचा भूगोलचा पेपर होणार, ५० प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे पडलेला प्रश्न सुटला, पालक अन् विद्यार्थ्यांचा जीव भांड्यात

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील दहावी बोर्ड परीक्षेचा उद्या होणारा भूगोलाचा पेपर (एुरा) दिलेल्या वेळापत्रकानुसारच होणार आहे. सोलापूर जिल्ह्याच्या सांगोल्यात (डरपसेश्वर) दहावीच्या परीक्षेदरम्यान भूगोलाचे ५० पेपर चोरी गेल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली होती. या संपूर्ण घटनेचा अहवाल पुणे बोर्डाने मागितला होता. त्यामुळे, उद्याच्या परीक्षेवर आणि बोर्डाच्या पेपरवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते, उद्या १० वी बोर्डाचा भूगोल विषयाचा पेपर होणार की नाही असा प्रश्न पालक आणि विद्यार्थ्यांना पडला होता. मात्र, बोर्डाने (SSC) दहावीचा पेपर वेळापत्रकानुसार होणार असं जाहीर केलं आहे.





बुधवारी दहावीचा भूगोलाचा पेपर शेड्युलनुसारच होणार आहे, विद्यार्थ्यांनी तयारी करून शांतपणे पेपर सोडवावा असे आवाहन पुणे एसएससी बोर्डाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी केले आहे. सांगोल्यातून उद्या होणाऱ्या भूगोलाच्या ५० पेपरची आज सकाळी चोरी झाली होती. त्यामुळे उद्याच्या पेपरबाबत पालक आणि विद्यार्थ्यांच्या मनात साशंकता होती. मात्र, उद्या ठरलेल्या वेळेप्रमाणेच भूगोलाचा पेपर होणार असल्याचे बोर्डाकडून सांगण्यात आलेले आहे. दरम्यान, बोर्डाने पेपर घेण्याचा निर्णय घेतल्याने दहावीच्या भूगोलाच्या पळवून नेलेल्या ५० पेपरचे झेरॉक्स, फोटो कोणी काढले असेल आणि ते जर व्हायरल केले असेल तर त्याची जबाबदारी बोर्ड स्वीकारणार का असा प्रश्न उपस्थित होतो आहे. सांगोला येथील बोर्डाचे पेपर चोरीप्रकरणी प्रभारी शिक्षणाधिकारी सुयोग नवले, विद्यामंदिर प्रशालेचे मुख्याध्यापक अमोल गायकवाड यांचेवर ठपका ठेवत शिक्षण विभागाने त्यांचे तडकाफडकी निलंबित केले आहे. याशिवाय या इथे सुरक्षेवर असणारे पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड यांच्याबाबतच्या अहवालानुसार त्यांच्यावरही निलंबनाची कारवाई होणार आहे. दरम्यान, उद्याचा बोर्डाचा भूगोलाचा पेपर ठरल्यावेळी प्रमाणेच घेतला जाणार आहे. विद्यार्थ्यांनी शांतपणे पेपर सोडविण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले आहे. या बैठकीला सोलापूरचे सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, बोर्डाचे प्रतिनिधी उकिरडे, सोलापूरचे माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप उपस्थित होते.

# दहावीची परिक्षा देण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला; पुण्यातील ओतूरमध्ये परीक्षा केंद्रातील घटना

**ओतूर । प्रतिनिधी**

ओतूर येथील श्री संत गाडगे महाराज विद्यालयातील एसएससी परीक्षा केंद्रात सोमवारी सकाळी धक्कादायक प्रकार घडला. एका अल्पवयीन मुलाने परीक्षा केंद्राच्या वर्गात घुसून दहावीच्या विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला केला. विद्यार्थ्याने मानेवरील वार हातावर झेलल्याने मोठी दुर्घटना टळली, मात्र तो जखमी झाला. जुन्या वादातून हा हल्ला झाल्याची माहिती असून, ओतूर पोलिसांनी आरोपीसह आणखी चार जणांना ताब्यात घेतले आहे. हल्ल्यात वापरलेला कोयता जप्त करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

या घटनेबाबत मुख्याध्यापकांनी माहिती देताना सांगितलं की, एका मुलाच्या हातावर वार केले होते, तिथं मोठा




गोंधळ झाला होता, आम्ही सगळे गेलो तिथली परिस्थिती हाताळली. आरोपी अकरावीमध्ये शिकतो, त्याला पोलिस स्टेशनला नेलं. ज्या मुलाच्या हातावरती वार झाले त्याच्यावरती औषध उपचार केले, त्यानंतर त्याला रायटर दिला त्या मुलाने परिक्षा दिली आहे. चार आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. चार जण इथे आले होते, त्यांची आधीही भांडण झाली असल्याची चर्चा आहे. एकूण १३ शाळेचे हे केंद्र आहे, रोज पोलिस आणि २ आरोग्य केंद्राचे अधिकारी असतात, अशी माहिती मुख्यध्यापकांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. घटनेनंतर पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतलं आहे. तर जखमी विद्यार्थ्याने दिलेल्या माहितीनुसार, ६ तारखेला देखील त्या मुलांनी त्याच्यावरती हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. तर ६ तारखेला माझ्या माहितीप्रमाणे असा काही प्रकार घडला नाही, असं मुख्यध्यापकांनी म्हटलं आहे. तो मुलगा सांगत असला तरी देखील आमच्या सीसीटीव्हीमध्ये असं काही दिसत नाही, जर तसं काही घडलं तर पालकांनी आम्हाला ती माहिती द्यायला हवी होती, आमच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांना याबाबत माहिती नाही, असंही मुख्यध्यापकांनी सांगितलं आहे. ही घटना १०.३५ ला घडली, त्यावेळी त्या वर्गामध्ये कोणताही शिक्षक किंवा कर्मचारी नव्हता, हे सर्वात मोठं सेंटर आहे, आम्ही बेल वाजल्यानंतर मुलांना गेटमधून आत घेतलं जातं, त्यांचं हॉल तिकिट त्यांचं वर्गात चेक केला जात आहे, अशा घटना रोखण्यासाठी आम्ही योग्य त्या उपाययोजना करू, सेंटर मोठं असल्यामुळे मुले खूप येतात, आता यापुढे गेटवरतीच आम्ही हॉलतिकीट चेक करून मुलांना आतमध्ये सोडलं जाईल असंही शाळेच्या मुख्यध्यापकांनी म्हटलं आहे.

# स्नूकर खेळताना दिली खुन्नस, संतापलेल्या अल्पवयीन मुलांनी आपल्याच मित्राचा भर चौकात

**पुणे । प्रतिनिधी**

किरकोळ वाद किती टोकाला जाऊ शकतो, याचे धक्कादायक उदाहरण पुण्यात समोर आले आहे. सिंहगड रोड परिसरात सोमवारी संध्याकाळी तीन अल्पवयीन मुलांनी धारदार शस्त्राने हल्ला करत १९ वर्षीय तरुणाचा निर्घृण खून केला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मृत तरुणाचे नाव करण काशीद असे असून, तो स्थानिक रहिवासी होता. सोमवारी संध्याकाळी भर चौकात ही घटना घडली. प्रत्यक्षदर्शींच्या मते, तिघांनी अचानक करणवर हल्ला चढवत त्याच्यावर सपासप वार केले. गंभीर जखमी अवस्थेत त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र



उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काही महिन्यांपूर्वी करण काशीद आणि आरोपी अल्पवयीन मुलांमध्ये ओळख होती. जानेवारी महिन्यात स्नूकर खेळत असताना करणने आरोपींकडे रागाने पाहिले होते. या क्षुल्लक कारणाचा राग आरोपींनी मनात ठेवला. त्यातूनच त्यांनी करणचा खून करण्याचा कट रचल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. आरोपींनी संधी साधत करणला गाठले आणि धारदार शस्त्रांनी त्याच्यावर हल्ला केला. हा हल्ला पूर्वनियोजित असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच सिंहगड रोड पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला आणि काही तासांतच तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. सर्व आरोपी अल्पवयीन असल्याने त्यांना आज बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# पीडीसीसी बँकेच्या क्लार्क भरतीचा निकाल लवकरच जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून (पीडीसीसी बँक) क्लार्क पदाच्या ३५६ जागांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल लवकरच घोषित होणार आहे. त्यादृष्टीने बँकेकडून महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल) या परीक्षा घेणाऱ्या एजन्सीला पत्रान्वये कळविण्यात आल्याची माहिती बँकेकडून मिळाली. त्यामुळे परीक्षेस बसलेल्या उमेदवारांची बऱ्याच दिवसांची प्रतीक्षा संपणार आहे.

बँकेच्या कार्यरत असलेल्या सर्व शाखांमध्ये रिक्त पदांमुळे कामकाजात अधिक गतिमानता आणण्यासाठी परीक्षेद्वारे क्लार्क पदाच्या जागा भरण्याचा निर्णय तत्कालीन संचालक मंडळाने घेतला होता. त्यानुसार पहिल्या टप्प्यात सुमारे ३५६ पदांसाठी लेखी परीक्षा झालेली आहे. बँकेच्या दीर्घकाळ लांबलेल्या या परीक्षेच्या निकालाकडे उमेदवारांचे लक्ष लागलेले आहे. आता मात्र हा निकाल एमकेसीएल एजन्सीकडून लवकरच घोषित होणार असल्याचे सांगण्यात आले. राज्यात पीडीसीसी बँक ही वार्षिक सुमारे २७ हजार कोटी रुपयांचा व्यवसाय करणारी एक अग्रागण्य बँक आहे.

पुणे जिल्ह्यात बँकेच्या २९४ शाखा कार्यरत आहेत. शेतकऱ्यांसह ग्राहकांसाठी बँकेकडून विविध कर्ज योजना राबविल्या जातात. त्यामध्ये पीक कर्जासह साखर कारखान्यांना देण्यात येणारे कर्ज, शैक्षणिक, व्यावसायिक कॅश क्रेडिट, ग्राहकोपयोगी वस्तू, औद्योगिक, वाहन, सोने तारण, गृहकर्ज आदींचा समावेश आहे. रिक्त जागांच्या पदभरतीनंतर बँकेच्या दैनंदिन कामाचा वेग वाढून योजना अंमलबजावणीलाही गती मिळणे अपेक्षित असल्याचे सांगण्यात आले.

# आधी मोबाईल फॉर्मेट केला, नंतर १९ वर्षीय तरुणानं राहत्या घरात सीट बेल्टनं आयुष्य संपवलं; पिंपरी-चिंचवडमधील घटनेनं खळबळ

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील दिघी परिसरात एका १९ वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना रविवारी रात्री उघडकीस आली. अथर्व विजय देशमुख असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव असून आत्महत्येपूर्वी त्याने स्वतःचा मोबाईल फोन फॉर्मेट केल्याची माहिती समोर आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अथर्व देशमुख हा दिघी येथील गंगोत्री हॉस्पिटलजवळ पार्वती भोजने यांच्या घरी भाड्याने राहत होता. रविवारी (दि.१५) सायंकाळी साडेसातच्या सुमारास त्याने राहत्या घरात सीट बेल्टच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली. घटना घडली तेव्हा घराचा दरवाजा आतून बंद होता. दरम्यान, अथर्वने बराच वेळ प्रतिसाद न दिल्याने त्याची आई ज्योती देशमुख




आणि शेजाऱ्यांना संशय आला. त्यांनी खिडकीतून घराची कडी उघडून आत प्रवेश केला असता अथर्व गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याला तातडीने खाली उतरवून जवळील गंगोत्री हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. मात्र, त्याची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी पिंपरी येथील वाय.सी.एम. रुग्णालयात हलवण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच दिघी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून पुढील प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, अथर्वच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र आत्महत्येपूर्वी त्याने आपला मोबाईल फोन फॉर्मेट केल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाबाबत विविध शक्यता व्यक्त केल्या जात असून दिघी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# महाराष्ट्र साहित्य परिषदेचा डिजिटल विस्तार; शंभरावे संमेलन भव्य करण्याचा मानस

**पुणे । प्रतिनिधी**

आजीव सभासदांची यादी अद्ययावत करणे, साहित्य परिषदेत डिजिटल व्यासपीठावर आणण्यासह पुण्यात होणारे आगामी शंभरावे साहित्य संमेलन देदीप्यमान करण्याचा प्रयत्न असेल, असे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष योगेश सोमण यांनी सोमवारी (दि. १६) पत्रकार परिषदेत यांनी सांगितले. गुरुवारी (दि. १९) गुढीपाडव्याच्या दिवशी पुस्तकांची गुढी उभारून परिषदेच्या कामास आमची कार्यकारिणी सुरुवात करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर सोमवारी साहित्य संवर्धन आघाडीच्या विजयी उमेदवारांनी पत्रकार परिषद घेऊन पुढील उपक्रमांबाबतची माहिती दिली. नवनिर्वाचित प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोशाध्यक्ष प्रदीप निफाडकर, कार्यवाह सुनील महाजन, प्रसाद मिरासदार, नितीन संगमनेरकर आदी उपस्थित होते. एप्रिलपासून महाराष्ट्र साहित्य परिषद आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची सूत्रे नवीन कार्यकारिणीकडे येणार असून, प्रत्यक्ष कामकाजाला १ एप्रिलपासून सुरुवात करणार असल्याचे सोमण यांनी सांगितले.

आगामी उपक्रमांची माहिती देताना सोमण म्हणाले, आम्ही वेगवेगळे उपक्रम राबविणार आहोत. मसापची आजीव सभासदांची यादी अद्ययावत करण्यावर भर असणार आहे. हे वर्षभर चालणारे काम आहे. त्यासाठी पदाधिकारी हे मसापच्या शाखांना भेटी देऊन माहिती गोळा करून यादी अपडेट करण्याचे काम करणार आहे. तसेच, परिषदेची साहित्य पत्रिका आता डिजिटल स्वरुपात उपलब्ध आहे. पण, निवडणुकीच्या निमित्ताने विविध शाखांना भेटी दिल्यावर ९५ टक्के सभासदांनी छापील स्वरुपातील पत्रिका पुन्हा सुरू करा, अशी मागणी केली होती. साहित्य पत्रिकेचा संदर्भ पुस्तिका म्हणून वापर व्हायचा. पत्रिकेमध्ये शाखांमध्ये झालेले विविध उपक्रम, कविता, लेख असायचे. साहित्य परिषदेतील शाखा आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यामधील सुसंवाद असायचा, म्हणून सभासदांच्या मागणीमुळे छापील स्वरुपातील पत्रिका आम्ही पुन्हा सुरू करणार आहोत. निफाडकर यांनी सभासदांच्या नवीन नावनोंदणी आणि नावनोंदणीसाठीचे शुल्क कमी करण्यावर चर्चा करून निर्णय घेऊ, सभासदत्वासाठीच्या जुन्या अर्जांचीही माहिती घेणार आहोत, असे नमूद केले. तर साहित्य परिषद पूर्णपणे डिजिटल करण्यासह साहित्य महामंडळाचे संकेतस्थळ सुरू करणार आहोत, अशी माहिती महाळंक यांनी दिली.

# हडपसरमध्ये पाणीटंचाई तीव्र; योजनेच्या विलंबाविरोधात उपोषणाचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेकडून हडपसर परिसरात राबविण्यात आलेल्या समान पाणीपुरवठा योजनेची कामे रखडल्याने नागरिकांना तीव पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत. येथील पाण्याच्या टाक्यांची कामे तातडीने पूर्ण करावे, योजना कार्यान्वित होईपर्यंत पाणी मीटर बसविण्याची सक्ती करू नये, अशी मागणी करत मागण्या पूर्ण न झाल्यास ३० मार्चपासून बेमुदत उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते प्रशांत सुरसे आणि पल्लवी सुरसे यांनी दिला आहे.

महापालिकेने सन २०१६ ते २०१८ या कालावधीत हडपसर परिसरात समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत विविध पाणीपुरवठा प्रकल्प हाती घेतले होते. मात्र, सात ते आठ वर्षे उलटूनही या योजनांची कामे पूर्णपणे कार्यान्वित झालेली नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही परिसरात अजूनही कमी दाबाने आणि अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक सोसायट्यांना टँकरद्वारे पाणी खरेदी करावे लागत असल्याने आर्थिक तसेच मानसिक ताण वाढत



असल्याचेही स्थानिकांचे म्हणणे आहे. तुकाई टेकडी, हडपसर बस डेपो परिसर तसेच आनंदनगर भागात उभारण्यात आलेल्या विविध जलसाठा प्रकल्पांमधून हडपसर गावठाण, गाडीतळ, सातववाडी, गोंधळेनगर, लक्ष्मी कॉलनी, आकाशवाणी परिसर, ससाणेनगर तसेच काळे बोराटे- न्हावले नगर या भागांना नियमित पाणीपुरवठा होणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी रात्री उशिरा किंवा मर्यादित वेळेसाठीच पाणी येत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. या संदर्भात गेल्या वर्षभरापासून प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे सुरसे यांनी सांगितले.

त्यांनी महापालिका आयुक्तांची भेट घेऊन या विषयासंदर्भात स्मरणपत्रही दिले आहे. त्यामध्ये प्रलंबित पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण कराव्यात, योजना पूर्ण होईपर्यंत पाणी मीटर बसविण्याची सक्ती करू नये तसेच हडपसर परिसर टँकरमुक्त करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास ३० मार्चपासून गाडीतळ, हडपसर येथे बेमुदत उपोषण आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी महापालिका प्रशासनाची राहील, असेही सुरसे यांनी स्पष्ट केले.